संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा










रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २७.११.२०२४ | अंक नं. २२५ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020
















# एसटीच्या तीनही बसस्थानकातील 'चौकशी कक्ष' ठरताहेत निरुपयोगी

## सर्व ठिकाणचे दूरध्वनी बंद, चौकशीबाबत टोलवाटोलवी, प्रवाशांची मोठी गैरसोय

सविस्तर वृत्त पान ७ वर...









जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## चक दे इंडिया – महिला खेळाडूंचे अभिनंदन

नुकतेच आपल्या भारतीय महिला हॉकी संघाने चीनला नमवून आशियाई हॉकी करंडकावर आपले सुवर्ण नाव कोरले. चक दे इंडिया – या सर्व खेळाडू व संबंधित स्टाफचे विशेष अभिनंदन.

अलीकडेच भारतीय महिला क्रिकेट संघाची माजी फिरकीपटू नीत् डेव्हीडला आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) 'हॉल ऑफ फेम' मध्ये सामील केले. अशा प्रकारचा सन्मान मिळवणारी ती दसरी भारतीय महिला क्रिकेटपटू आहे. या नीत्ने गोलंदाजडीत अशा काही सर्वोत्तम कामगिरी केली आहे की आजपर्यंत कोणत्याही महिला क्रिकेटपटूला तिचा विक्रम मोडता आलेला नाही.

एकंदरीतच जिल्हा पातळीपासून ऑलिम्पिक व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या भगिनी, युवा खेळाडू कर्तृत्वाची व यशाची पायाभरणी दिमाखात करीत आहे.




खळ हा एकूणच व्यक्तिमत्त्व विकासाचा महत्त्वाचा घटक असून आजचे पालक आपल्या मुलामुलींना खेळण्यास सहकार्य, प्रोत्साहन देत आहेत.



महिला मुळातच सिन्सिअर, शिस्तप्रिय असतात. त्यांना निरंतर प्रोत्साहन, पाठिंबा देणे गरजेचे आहे. त्यामुळे त्या आपल्या गाव, तालुका, जिल्हा, राज्य व देशाचे नाव उंचावू शकतात.

यानिमित्त पुनश्च खेळासह विविध क्षेत्रात उज्वल कामगिरी करणाऱ्या महिलांचे हार्दिक अभिनंदन व शुभकामना.

# मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीसांची वर्णी लागण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे 'श्री विशाल गणेशा'ला साकडे

### राज्याच्या भल्यासाठी, विकासासाठी व गतिमान निर्णयक्षम शासनासाठी मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीसच योग्य व्यक्ती : ॲड.अभय आगरकर

नगर – राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने दैदिप्यमान यश मिळवत सर्वात मोठा पक्ष झाला आहे. महायुतीचे दोन्ही मित्र पक्ष जरी बरोबर असले तरी भाजपाचे सर्वात जास्त आमदार निवडून आल्याने भाजपाचाच मुख्यमंत्री व्हावा ही सर्व कार्यकर्त्यांची मागणी आहे. त्यामुळे राज्याची धुरा पुन्हा देवेंद्र फडणवीस यांच्याच हातात पुन्हा द्यावी अशी मागणी आमची असून ती पूर्ण होण्यासाठी श्री गणेशाला साकडे घातले आहेत. महाराष्ट्राच्या भल्यासाठी, विकासासाठी गतिमान शासन येण्यासाठी मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीसच योग्य व्यक्ती आहे. येणाऱ्या काळात विकसित राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पहिले जात असताना देवाभाऊच्या नेतृत्वाखालीच सक्षम व निर्णयक्षम सरकार येऊ शकते. त्यामुळे देवेंद्र फडणवीसांना पक्षाने पुन्हा संधी द्यावी, असे प्रतिपादन भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड.अभय आगरकर यांनी केले



शहर भाजपच्या वतीने मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीसांची वर्णी लागण्यासाठी ग्रामदैवत श्री विशाल गणपतीची महाआरती करून साकडे घालण्यात आले. यावेळी पदाधिकारी उपस्थित होते.

राज्याच्या मुख्यमंत्रीपदी भाजपचे देवेंद्र फडणवीस यांनाच संधी मिळावी, यासाठी शहर भाजापाच्या वतीने ग्रामदैवत श्री विशाल गणपतीची महाआरती करून साकडे घालण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी गणपती अथर्वशीर्षाचे २३० पाठ केले. ॲड.अभय आगरकर यांनी संकल्प केला. यावेळी श्री गणेशाचा जयजयकार करत एकच मुख्यमंत्री देवाभाऊ मुख्यमंत्री..., एकच भाऊ देवाभाऊ... अशा घोषणा देत राज्याच्या मुख्यमंत्रीपदी देवाभाऊच विराजमान व्हावेत अशा घोषणा देण्यात आल्या.

यावेळी वसंत लोढा, सरचिटणीस सचिन पारखी व प्रशांत मुथा, महेश नामदे, सुवेंद्र गांधी, महाविर कांकरिया, पंडित वाघमारे, राजेंद्र काळे, गोपाल वर्मा, बाबासाहेब सानप, अनंत देसाई, प्रविण ढोणे, दामोदर बठेजा, रविंद्र बारस्कर, मनोज ताठे, अजय ढोणे, राजेंद्र सातपुते, रामदास आंधळे, राजेंद्र फुलारे, बाळासाहेब भुजबळ, बाळासाहेब गायकवाड, अमोल निस्ताने, नितीन शेलार, कैलास गर्जे, वैभव लांडगे, अनिल ढवण, दत्ता गाडळकर, दिपक देहेरेकर, सुहास पाथरकर, महिला पदाधिकारी संध्या पावसे, ज्योती दांडगे, कालिंदी केसकर, सुरेखा जंगम, श्वेता पंधाडे, रेखा मैड, सुजाता पुजारी, मिरा सरोदे, लिलावती अग्रवाल, प्रतिभा पेंडसे, पद्मा देशपांडे, सोनाली पाठक, विद्या कुलकर्णी, छाया रजपूत, उज्वला भांगे आदीं उपस्थित होते.

## अपघाताच्या कारणातून केडगावात दोन गटात हाणामारी; चाकूने वार; पोलिसांत परस्परविरोधी गुन्हे दाखल

नगर – किरकोळ अपघाताच्या कारणातून केडगाव उपनगरातील वैष्णवनगर येथे दोन गटांत वाद होवून हाणामारीची घटना घडली. यात एकावर चाकूने वार करण्यात आले आहेत. या प्रकरणी परस्पर विरोधी फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

चाकू हल्ल्यात जखमी सुनील अंबादास पवार (वय ३५, रा. वैष्णवनगर, तिरंगा चौक, केडगाव) यांनी रूग्णालयात उपचार सुरू असताना दिलेल्या जबाबावरून भोर्या (पूर्ण नाव नाही, वय अंदाजे २५, रा. वैष्णवनगर, केडगाव) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पवार यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, 'सोमवारी (दि.२५) रात्री नऊ वाजता मी माझे प्लबींगचे काम उरकुन माझे घरी जात असतांना भोर्या हा मला वैष्णव चौकात भेटला व २४ नोव्हेंबर रोजी झालेल्या अपघाताच्या कारणातून त्याने चाकूने माझ्यावर हल्ला करून जखमी केले.

दुसर्या गटाच्या सुनीता संतोष जाधव (वय ४०, रा. वैष्णवनगर, केडगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सनी पवार (पूर्ण नाव नाही) व त्याच्या दोघा भावांविरूध्द (नावे नाहीत) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनीता यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, 'सोमवारी (दि.२५) रात्री आठ वाजता सनी पवार व त्याचे दोन भाऊ त्यांच्याकडे आले. तुमचा मुलगा राहुल कुठे आहे असे विचारून शिवीगाळ केली. मुलगा राहुल तेथे आला असता त्याला लाकडी दांडके व लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केले. मोठा मुलगा शुभमला देखील मारहाण केली. तुम्ही येथे राहायचे नाही, तुम्ही येथून निघून जायचे अशी धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

# साथी अभियानांतर्गत ३० नोव्हेंबरपर्यंत पात्र अनाथ बालकांना प्रमाणपत्र वितरण

नगर – अनाथ बालकांना शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा या उद्देशाने महिला व बालविकास विभाग व विभागीय उपायुक्त यांच्यामार्फत अनाथ बालकांना अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येते. त्या अनुषंगाने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी व बाल कल्याण समिती व संस्था यांच्या समन्वयातून शासन आपल्यासोबत साथी अभियानाच्या माध्यमातून ३० नोव्हेंबर पर्यंत जिल्ह्यातील पात्र अनाथ बालकांना अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी एन.बी. कराळे यांनी दिली आहे.

अनाथ बालकांना शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा या उद्देशाने एक टक्का समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. त्यानुसार महिला व बाल विकास विभागामार्फत अनाथ बालकांना विभागीय उपआयुक्त यांच्यामार्फत अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येते. त्यानुसार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय अहिल्यानगर, बाल कल्याण समिती अहिल्यानगर व सर्व महिला व बाल विकास विभाग, समाज कल्याण विभाग आदिवासी विकास विभाग या अंतर्गत सर्व शासकीय, अशासकीय संस्था यांच्या समन्वयाने अनाथ संस्थात्मकव जे बालक अनाथ संस्थाबाह्य अनाथ (मामा काका चुलते आत्या) या पालकांनी सांभाळ केलेला आहे. सर्व बालकांनी ३० नोव्हेंबरपर्यंत सर्व पात्र अनाथ बालकांना अनाथ प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यासाठी शासन आपल्या सोबत साथी अभियान राबविण्यात येणार आहे. ज्या बालकांचे आई व वडीलांचा मृत्यू हा त्या बालकाचे वय १८ वर्ष पूर्ण होण्या अगोदर झालेले आहे. अशी बालके अनाथ प्रमाणपत्राकरिता अर्ज सादर करु शकतात.

तरी अनाच बालकांनी अनाथ प्रमाणपत्राकरिता जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, वंदे मातरम् कॉलनी नगर कल्याण रोड शिवाजीनगर अहिल्यानगर येथे अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी एन. बी. कराळे यांनी केले आहे.


## नगर क्लबमधून विविध साहित्याची चोरी

### अज्ञात चोरट्यांच्याविरुद्ध भिंगार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – जिल्हाधिकारी पदसिद्ध अध्यक्ष असलेल्या अहमदनगर क्लबच्या दोन खोल्यांची कुलुपे तोडून अज्ञात चोरट्यांनी ३५ हजार ५०० रुपये किंमतीचे साहित्य चोरून नेल्याची घटना मंगळवारी (दि.२६) सकाळी उघडकीस आली आहे.

याबाबत दिगंबर ध्यानसिंग रावल (वय ५३, रा. शक्तीनगर, सोलापूर रोड) यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यामध्ये म्हंटले आहे की, सोमवारी (दि.२५) रात्री १२.३० ते मंगळवारी (दि.२६) सकाळी ७ या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी नगर क्लब मध्ये प्रवेश करत २ खोल्यांची कुलुपे तोडली. या खोल्यांमध्ये ठेवलेले टेनिसचे रॅकेट, शिलाई मशीन तसेच इलेक्ट्रिक ॲम्प्लीफायर मशीन अशा ३५ हजार ५०० रुपये किंमतीच्या वस्तू चोरून नेल्या आहेत. मंगळवारी सकाळी ही घटना उघडकीस आली.

याबाबत त्यांनी दिलेल्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून नगर क्लब परिसरात असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासत चोरट्यांचा शोध घेतला जात आहे.



**आमदार संग्राम जगताप यांना मंत्रिपद मिळावे यासाठी किसनगिरीनगर येथील मंदिरात महाआरती**

आमदार संग्राम जगताप यांनी तिसऱ्यांदा विजय मिळवून अहिल्यानगर मध्ये हॅट्रिक केली आहे. अहिल्यानगर शहराचा दीडशे कोटीहून अधिक निधी आणून अहिल्यानगर शहराचा मोठा विकास केला आहे. संग्राम जगताप यांना मंत्रीपद मिळावे यासाठी किसनगिरीनगर येथील गुरुदत्त भक्तीधाम मंदिरात सद्गुरु किसनगिरी बाबा भक्त मंडळाच्या वतीने महाआरती करण्यात आली. याप्रसंगी तुषार यादव, राजू तागड, विलास रोडे, बाबासाहेब वरखडे, दत्तात्रय असणे बाबा भक्त मंडळ व श्री समर्थ सद्गुरु किसनगिरी बाबा भक्त मंडळ अहिल्यानगर उपस्थित होते.

## पांढरीपूल घाटात अपघात, युवकाचा जागीच मृत्यू

### दुचाकीवरुन घसरून पडल्यावर अज्ञात वाहनाने दिली धडक

नगर– छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील पांढरीपुल घाट उतरताना वळणावरून दुचाकी घसरून पडलेल्या तरूणाला अज्ञात वाहनाने धडक दिली. या धडकेत त्यांचा मृत्यू झाला. रावसाहेब सखाराम कातोरे (वय ३८ रा. सोनई ता. नेवासा) असे मयत तरूणाचे नाव आहे. रविवारी (दि.२४) रात्री सव्वा आठच्या सुमारास खोसपुरी (ता. नगर) गावच्या शिवारात हॉटेल लिलियम पार्क समोर ही घटना घडली.

मयत रावसाहेब कातोरे यांचे भाऊ बाळासाहेब सखाराम कातोरे (वय ४०, रा. धनगरवाडी, सोनई ता. नेवासा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात वाहनावरील अज्ञात चालकाविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात सोमवारी (दि.२५) सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवारी रात्री रावसाहेब कातोरे हे त्यांच्याकडील दुचाकीवरून (क्र. एमएच २० बीए २०५) अहिल्यानगर– छत्रपती संभाजीनगर महामार्गावरून प्रवास करत असताना पांढरीपुल घाट उतारावरती हॉटेल लिलियम पार्क समोर दुचाकी वळनावर घसरली.

त्यानंतर काही क्षणात पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनाची त्यांना धडक बसली. या धडकेत रावसाहेब यांच्या डोक्याला मार लागल्याने ते गंभीर जखमी होवून त्यांचा मृत्यू झाला असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार दिवटे करत आहेत. दरम्यान, पांढरीपुल घाट उतरताना यापूर्वी अनेक अपघात होवून अनेकांचा जीव गेला आहे. वारंवार अपघात होत असून देखील त्या ठिकाणी उपययोजना केल्या जात नाही.

# रात्रीचे वेळी घरात घुसुन दागिने चोरी करणारा पकडला; पोलिसांनी आरोपीकडून केला दीड लाखाचा ऐवज जप्त

नगर – रेल्वे स्टेशन परिसरात इंगळे वस्ती येथे रात्रीचे वेळी घरात घुसुन माहेरी आलेल्या महिलेचे दागिने चोरी करणारा आरोपी कोतवाली पोलिसांनी पकडला आहे. त्याच्या कडून चोरीतील सुमारे दीड लाखाचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.

याबाबत काजल आकाश पंधारे (वय २५,रा. पोखर्डी, ता.नगर) यांनी दि.९ नोव्हेंबर रोजी फिर्याद दिली होती. त्या माहेरी इंगळे वस्ती येथे आलेल्या असताना रात्री च्या वेळी कोणीतरी अज्ञात चोरट्याने घराचे आत प्रवेश करून त्यांचे पर्स मधुन सोन्याचे मंगळसुत्र चोरुन नेले होते. त्यांच्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास व आरोपीचा शोध घेत असतांना पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना गोपनीय मिळाली की, सदर गुन्ह्यातील आरोपी हा रेल्वेस्टेशन परिसरात चोरीतील दागीने विक्री करण्याकरिता आलेला आहे अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने त्यांनी गुन्हे शोध पथक रेल्वेस्टेशन परिसरात पाठविले. या पथकाने सापळा लावुन संशयित इसम संजय ज्ञानदेव धिवर (वय.२९, रा.इंगळे वस्ती, रेल्वे स्टेशन) याला ताब्यात घेतले.




रेल्वे स्टेशन परिसरात इंगळे वस्ती येथे रात्रीचे वेळी घरात घुसुन दागिने चोरी करणारा चोरटा पकडल्यानंतर त्याच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

त्याचेकडे विचारपुस करता त्याने प्रथम उडवाउडवीची उत्तरे दिली, त्यास अधिक विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. त्याची अंगझडती घेता त्याचेकडे घरातून चोरी केलेले दागिने मिळून आले आहेत. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पो.हे.कॉ. शरद वाघ हे करत आहेत.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचे मार्गदर्शनाखाली महिला स.पो.नि. योगीता कोकाटे, स.फौ. सुनील भिंगारदिवे, पो.हे.कॉ. योगेश भिंगारदिवे, विशाल दळवी, सलिम शेख, विक्रम वाघमारे, राजेंद्र पालवे पो.कॉ. अभय कदम, अमोल गाडे, सतिष शिंदे, अतुल काजळे, दक्षिण मोबाईल सेलचे राहुल गुंडू यांनी केली आहे.

## सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक बबनराव सागडे यांचे निधन

नगर – शेवगाव तालुक्यातील वडुले बुद्रुक येथील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक बबनराव यादवराव सागडे (वय ८२) यांचे २४ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. शेवगाव तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी ते सतत अग्रभागी असायचे.



त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, जिजामाता कॉलेज भेंडा येथील प्राध्यापक डॉ. अशोक सागडे यांचे ते वडील होते.

# नगर-सोलापूर महामार्गावर अपघात, नगरमधील युवकाचा जागीच मृत्यू

नगर – भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना नगर-सोलापूर महामार्गावर साकत (ता.नगर) गावच्या शिवारात मंगळवारी (दि.२६) रात्री घडली. ऋत्विक बाळासाहेब लोखंडे (वय २४, रा. संजयनगर, काटवन खंडोबा) असे मयत युवकाचे नाव आहे. तो शहरातील काटवन खंडोबा परिसरात स्नेहालयच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या संजयनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचा समन्वयक म्हणून काम पाहत होता.



ऋत्विक लोखंडे (मयत)

मयत ऋत्विक लोखंडे हा रुईछत्तीसी येथे मित्राच्या घरी गेला होता. तेथून नगर सोलापूर महामार्गाने दुचाकीवर नगर कडे परतत असताना साकत (ता.नगर) गावच्या शिवारात त्याच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने धडक दिली. त्यात तो गंभीर जखमी झाला. स्थानिक नागरिकांनी त्याला रुग्णवाहिकेद्वारे जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविले. मात्र डॉक्टरांनी त्यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबत नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मयत ऋत्विक लोखंडे हा स्नेहालय प्रकल्पात गेल्या ७ वर्षांपासून कार्यरत होता. त्याच्याच देखरेखीखाली काटवन खंडोबा परिसरात संजयनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे काम सुरु आहे. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना या प्रकल्पात २९८ घरे बांधून दिली जात आहेत. त्यातील ३३ घरे बांधून पूर्णही झालेली आहेत. या शिवाय स्नेहालय ने काढलेल्या भारत – बांग्लादेश सायकल यात्रेचे सर्व नियोजन ऋत्विक यानेच पाहिले होते. त्याच्या अपघाती निधनाने स्नेहालय प्रकल्पाचा एक मोठा कणा हरपला असल्याचे गिरीश कुलकर्णी व हनीफ शेख यांनी सांगितले. मयत ऋत्विक याच्या पश्चात आई – वडील, २ बहिणी, १ भाऊ असा परिवार आहे.

## नगर – पुणे महामार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

नगर – नगर – पुणे महामार्गावर चास (ता.नगर) गावच्या शिवारात असलेल्या हॉटेल माथेरान समोर रस्ता ओलांडणाऱ्या परप्रांतीय व्यक्तीला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने गंभीर जखमी होवून त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि.२५) रात्री १०.३० च्या सुमारास घडली. मंझिले राम अवतार (वय ५२, रा. कानपूर, उत्तरप्रदेश) असे मयताचे नाव आहे.

याबाबत सुनिल मिश्रा (वय ५५, रा. कानपूर, उत्तरप्रदेश) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे वाहन चालक असून मयत त्यांच्या सोबत क्लीनर म्हणून काम करत होता. ते दोघे पुण्याहून नगरकडे येत असताना सोमवारी (दि.२५) रात्री हॉटेल माथेरान येथे जेवण्यासाठी थांबले होते. त्यांचे वाहन हॉटेलच्या समोर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला उभे केलेले होते. रात्री १०.३० च्या सुमारास जेवण झाल्यावर मयत मंझिले राम अवतार हे रस्ता ओलांडत असताना भरधाव वेगात आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांना धडक देवून ते वाहन पसार झाले. या धडकेत मंझिले राम अवतार हे गंभीर जखमी झाले. त्यांना रुग्णवाहिका बोलावून उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेण्यात आले, मात्र तेथील डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबत सुनिल मिश्रा यांच्या फिर्यादी वरून अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### कॉफीमुळे मधुमेहापासून बचाव

कॉफीप्रेमींसाठी आनंदाची बातमी आहे. संशोधकांनी या पेयामधील मुख्य घटक शोधला असून, या घटकामुळे टाइप-२ चा मधुमेह होण्याचा धोका कमी होत असल्याचे आढळून आले आहे. डेन्मार्कमधील अरहूस विद्यापीठाच्या संशोधकांनी याबाबत अधिक संशोधन केले. संशोधकांनी कॉफी या पेयाम धील एक घटक शोधला असून, तो पेशींची कार्ये आणि इन्सुलिनची पातळी नियंत्रित करण्यामध्ये मदत करतो.

## पाककला

### पनीर-बटाटा भाजी

**साहित्य** – बटाटे, पनीर, गरम मसाला, टोमॅटो, मलई, थोडेसे दही, जिरे, धने, सैंधव मीठ व तूप.

**कृति** – बटाटे सोलून त्याच्या छोट्या फोडी करून घ्या. पनीरचे तुकडे करून घ्या. पनीर व बटाटे तळून काढा. त्यानंतर कुकरमध्ये जिरे, धने, गरम मसाला टाकून त्यात टोमॅटो टाका व पाणी ओतून उकळू द्या. उकळत्या पाण्यात पनीर व बटाटे टाका. नंतर एक चमचा दही व दोन चमचे मलई व मीठ टाकून खाली उतरवा व सर्व्ह करा अत्यंत चविष्ट भाजी होते.

## सौंदर्य

### आमलेल्या त्वचेसाठी

जर आपली त्वचा आमली असेल तर बेसनासारखी दुसरी वस्तू नाही. गुलाबपाण्यात बेसन मिसळून उटणे तयार करा. चेहऱ्यावर व शरीरावर लावा. नंतर स्नान करा. अत्यंत उत्साही तर वाटतेच परंतु सुगंधही येतो. त्याचप्रमाणे व्हॅसलिन लावावे. याने त्वचेवर सुरकुत्या पडत नाहीत.

## सल्ला

वापरलेली चहाची पावडर फेकून न देता ती गुलाबाच्या रोपट्याच्या कुंडीत वाळवून टाकावी. खतासारखा उपयोग होतो.

## वास्तू

घरातील कोणत्याही दरवाजाकडे पाय करून कधीही झोपू नये.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २८ नोव्हेंबर २०२४

**प्रदोष, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, कार्तिक कृष्णपक्ष, चित्रा ०७|३६, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. प्रशासकीय कामे पूर्ण होतील.

**वृषभ** : नोकरदार व्यक्तींनी कार्यात सावधगिरी बाळगावी. वादाची स्थिती टाळणे श्रेयस्कर. आर्थिक नुकसानाची शक्यता आहे.

**मिथुन** : आपल्या कौटुंबिक तणावांच्याा समस्यांचा प्रभाव आपल्या कार्यावर होऊ शकतो. महत्वाकांक्षा वाढतील. शत्रू वर्ग पराभूत होईल.

**कर्क** : यथायोग्य विचार करून कामे कराल. कौटुंबिक विषयांसाठी वेळ उत्तम राहील. अधिकार क्षेत्रात स्थिती अनुकूल राहील.

**सिंह** : बेपर्वाई आपणासमोर अनपेक्षित प्रश्न उभे करेल. आरोग्याची काळजी बाळगणे आवश्यक राहील.

**कन्या** : दिवसाच्या सुरुवातीला काही मोठे कार्य करायची वेळ येऊ शकते पण नंतर आपल्या मनात अनेक प्रकारच्या काळज्या घर करू शकतील.

**तूळ** : मित्रांबरोबर सामुदायिक उपक्रम किंवा पिकनिकच्या रूपात दिवसाचा आनंद घेऊ शकता.

**वृश्चिक** : मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. अनुकूल वार्ता मिळतील. नोकरीपेशा व्यक्तींसाठी उत्तम काळ आहे. मान-सन्मान वाढेल. दिवस चांगला आहे.

**धनु** : आज पैसे आणि बळाची विशेष भूमिका राहील. नंतर केव्हातरी एखाद्या सामाजिक समारंभात आपल्या विचारांचा परिणाम होईल.

**मकर** : बातम्या मिळाल्याने आपण एक सुखद परिस्थितीत आपणास बघाल. नोकरीपेशा व्यक्तींना अनुकूल परिस्थिती असेल.

**कुंभ** : स्वार्थी बनाल. प्रेम-प्रसंगात यश मिळेल. नोकरीपेशा व्यक्तींसाठी कामात स्थिती सुखदायक राहील.

**मीन** : आर्थिक व व्यापारिक मुद्द्यांबद्दल आपले गंभीर विचार श्रेयस्कर ठरतील. आपल्या प्रिय व्यक्तीबरोबर एकांतात वेळ घालवाल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगा : तू किती शिकली आहेस?
मुलगी : काहीच नाही कोर्स केलाय
मुलगा : कशाचा
मुलगी : डी.बी.एस.
मुलगा : म्हणजे काय
मुलगी : धुणी, भांडी, स्वयंपाक

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

- आफ्रीकेमधील सर्वात खाली असलेले ठिकाण कोणते? – लेक असाल
- जमिनी क्षेत्रफळाच्या दृष्टीने आफ्रिकेतील सर्वात मोठा देश कोणता? – अल्जिरीया
- आफ्रिकेतील सर्वात लहान देश कोणता? – सेचीलीस
- आफ्रिकेतील सर्वात मोठे तळे (बंदर) कोणते? – मादागास्कर प्रजासत्ताक

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०५९ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | | ५ |
| | ■ | ६ | | ७ | | ■ | |
| ८ | | | ■ | ९ | | १० | ■ |
| ■ | ■ | ११ | १२ | | ■ | १३ | १४ |
| १५ | ■ | १६ | | ■ | १७ | | |
| १८ | १९ | | ■ | २० | | ■ | |
| २१ | | | ■ | | ■ | २२ | |
| २३ | | ■ | २४ | | | | ■ |

**शब्दगंध क्र. ७०५८ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| चं | प | क | ■ | वा | रं | वा | र |
| द | र | द | रू | न | ■ | म | ■ |
| न | व | ■ | प | र | वा | न | गी |
| ब | ड | गा | ■ | ■ | रा | ■ | त |
| ट | ■ | ज | का | त | ■ | पो | ■ |
| वा | व | र | ■ | ळ | ■ | त | वा |
| ■ | शिं | ■ | र | म | ता | रा | म |
| स | ड | पा | त | ळ | ■ | ज | न |

**आडवे शब्द :-** १) शंकराचे एक नाव ४) आकडे मांडून त्यातून काही तरी फळ काढण्याची क्रिया; मॅथेमॅटिक्स ६) वारीला जणारा ८) एक थोर क्रांतिकारक – +++ साळवे (वस्ताद) ९) निमित्त; कारण ११) पाण्यात राहणारा एक हिंस्र प्राणी १३) गेलेला; भूत; अवस्था १६) अवस्था; वाईट दशा १७) वर्तणूक; वागणूक; चालणे; चालू नाणे १८) स्त्रिया वेणीत माळतात तो फुलांचा हार २०) रावणाच्या तोंडांची संख्या २१) फळातील रसाळ भाग; गर २२) किराणा दुकानदार; जीभ; जिव्हा २३) वाकलेला; झुकलेला २४) सूट; डिस्काउंट

**उभे शब्द :-** १) प्रश्न २) यांना 'हिंदवी स्वराज्य संस्थापक' असे म्हटले जाते ३) आशीर्वाद; नवरा मुलगा ४) दीन; दुबळा; रंक ५) समेट; सलोखा; साम ७) उणीव; कमतरता; वानवा १०) काख १२) विटीदांडूच्या खेळात दांडून विटी जेथून कोलतात तो छोटा खड्डा १४) महिलांचा एक दागिना १५) येणे १७) एक लोकप्रिय पेय १९) जग; विश्व; दुनिया २०) दडपण; वजन; प्रेशर २२) वारा; वायू; श्वसन

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : आजचा पुरुषार्थ उद्याचे भाग्य ठरणार आहे. – **पॉल शिअरर.**

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### टॉन्सिल्स् म्हणजे नेमके काय?

टॉन्सिल्स म्हणजे घशात असलेल्या लसिका ग्रंथींचा एक समूह. टॉन्सिल्समुळे श्वसनसंस्था आणि पचनसंस्था यांचे रोगकारक संक्रमणापासून संरक्षण होते. टॉन्सिल्स म्हणजे घशात असलेल्या लसिका ग्रंथींचा एक समूह. टॉन्सिल्समुळे श्वसनसंस्था आणि पचनसंस्था यांचे रोगकारक संक्रमणापासून संरक्षण होते. परंतु त्यांनाच जेव्हा जंतूंचा प्रादुर्भाव होऊ लागतो, तेव्हा त्यांचे गृहीत कार्य नाहीसे होते आणि प्रतिजैविके देऊन त्यांचेच संरक्षण करण्याची वेळ येते. अन्यथा शरीरावर अपायकारक परिणाम होऊ लागतात. टॉन्सिल्स म्हणजे घशात असलेल्या लसिका ग्रंथींचा एक समूह. टॉन्सिल्समुळे श्वसनसंस्था आणि पचनसंस्था यांचे रोगकारक संक्रमणापासून संरक्षण होते. टॉन्सिल्स म्हणजे घशात असलेल्या लसिका ग्रंथींचा एक समूह. टॉन्सिल्समुळे श्वसनसंस्था आणि पचनसंस्था यांचे रोगकारक संक्रमणापासून संरक्षण होते. परंतु त्यांनाच जेव्हा जंतूंचा प्रादुर्भाव होऊ लागतो, तेव्हा त्यांचे गृहीत कार्य नाहीसे होते आणि प्रतिजैविके देऊन त्यांचेच संरक्षण करण्याची वेळ येते. अन्यथा शरीरावर अपायकारक परिणाम होऊ लागतात. टॉन्सिल्स (गलवाताम) म्हणजे घशात असलेल्या लसिका ग्रंथींचा एक समूह. घशात जिभेमागे (पॅलेटाइन टॉन्सिल्स – तालु गिलायू), नाकामागे (ॲडेलॉइड्स– ग्रसनी गिलायू) व जिभेवर (लिंग्वल टॉन्सिल्स – जिव्हा गिलायू) टॉन्सिल्स असतात. या सर्वांनी मिळून वर्तुळाकार वाल्डेयर्ल्स रिंग (Waldeyerls ring) बनते. पांढऱ्या संरक्षक पेशींचे हे गड्डे. परंतु त्यांनाच जेव्हा जंतूंचा प्रादुर्भाव होऊ लागतो, तेव्हा त्यांची गृहीत कार्य करण्याची क्षमता संपते आणि प्रतिजैविके देऊन त्यांचेच संरक्षण करण्याची वेळ येते. अन्यथा शरीरावर अपायकारक परिणाम होऊ लागतात. टॉन्सिल्समुळे श्वसनसंस्था आणि पचनसंस्था यांचे रोगकारक संक्रमणापासून संरक्षण होते. टॉन्सिल्स लसिकाभ नावांच्या ऊतींपासून बनलेले असतात. या ऊतींपासून रक्तातील पांढऱ्या पेशींची (लसिका पेशींची) निर्मिती होत असते. या पेशी संक्रमणाचा प्रतिकार करतात. उदाहरणार्थ, जेव्हा शरीरावर जिवाणू किंवा विषाणूंचे संक्रमण होते तेव्हा लसिका पेशी त्यांचा नाश करतात तालू टॉन्सिल्सवर अनेक खळगे असतात. जिवाणू आणि अन्नकण या खळग्यांमध्ये अडकले जातात. शरीरात टॉन्सिल्सचे महत्त्व ६-१० वर्षांपर्यंत असते. तोपर्यंत प्रतिकारशक्ति करिताचे बाकी अवयव विकसित होतात. मुले जशी वयाने वाढतात तसे त्यांच्या टॉन्सिल्सचा आकार लहान होतो. श्वसनमार्गातील सूक्ष्मजीवांना प्रतिकार करताना टॉन्सिल्सच्या पृष्ठभागावरील खळग्यांत सूक्ष्मजीवांचा शिरकाव झाल्यास त्यात पू होऊ शकतो. काही वेळा संक्रमणामुळे टॉन्सिल्सदाह होतो आणि त्या सुजतात. वेदना दूर करण्यासाठी विश्रांती, मिठाच्या गुळण्या, वेदनाशामक गोळ्या दिल्या जातात. जिवाणूंचे संक्रमण असल्यास प्रतिजैविके देतात. मात्र विषाणूंचे संक्रमण झाल्यास टॉन्सिल्सशोथावर (ॲक्युट टॉन्सिलिटीस) प्रतिजैविकांचा काही उपयोग होत नाही. सामान्यपणे १०-४० वर्षे वयापर्यंतच्या व्यक्तीला हा आजार होऊ शकतो. १. तीव्र टॉन्सिल्सशोथामध्ये एकाएकी थंडी वाजून ताप भरतो. २. घसा दुखू लागल्याने गिळण्यास त्रास होतो. ३. सर्दी, खोकला येतो. ४. अरुची, अस्वस्थपणा वगैरे लक्षणेही दिसतात. ५. जबड्याच्या हाडामागे अवधानाच्या गाठी (लिम्फ नोड्स) वाढतात. ६. ग्रसनी टॉन्सिल्स (ॲडेनॉइड्स) वाढल्याने वा त्यांच्या शोथाने झोपताना श्वास घेण्यास अडथळा येतो. नाक बंद राहिल्याने टाळा वर उचलला जातो. नाक बसते व दात पुढे येऊ लागतात. ७. श्वासास दरुगधी येऊ लागते. ८. कान दुखतो वा फुटतो. कान-नाक-घसा तज्ज्ञ ऑपरेशन करताना योग्य काळजी घेतातच परंतु भुलीचे, रक्तस्रावाचे, जंतू-संसर्गाचे धोके लक्षात ठेवावेच लागतात. डॉक्टरांनी दिलेल्या सूचनांचे पालन करणे महत्त्वाचे असते. गरम, बोचतील असे कडक, तळकट, आंबट, तिखट पदार्थ ८-१० दिवस वर्ज्य करावेत. गुळण्या करून घसा स्वच्छ ठेवणे, औषधे घेणे, बोलावल्यानुसार तपासणीस जाणे गरजेचे असते.

## एकी

एक दोन तोंडाचा पक्षी, एका तळ्यात राहत होता... एकदा त्याला एक रामफळासारखे गोड फळ खायला मिळाले. तो फळ त्या पक्ष्याच्या एका तोंडाला खायला मिळाला तर... पक्ष्याच्या दुसऱ्या तोंडाला त्याचा खूपच हेवा वाटला... आणि त्याने पहिल्या तोंडाला अर्ध्या फळाची मागणी केली...

त्यावर पहिला तोंड त्याला म्हणाला... अरे... या फळाला तू खाल्लेस काय.... आणि मी खाल्ले काय... शेवटी आपला पोट तर एकच आहे...! तेव्हा हे अर्धे फळ... मी आपल्या बायकोला देतो.

त्या पहिल्या तोंडचे हे असे बोलणे ऐकून दुसऱ्या तोंडाला खूपच वाईट वाटले...! आणि त्या दिवसापासून तो तोंड निराशही राहायला लागला...

असाच एक दिवस, एक खूपच विषारी फळ दुसऱ्या तोंडाला मिळाले. ते बघितल्यावर पहिल्या तोंडाने ते नाही खाण्याचा सल्ला दिला... परंतु.... मागील वेळच्या रागामुळे दुसऱ्या तोंडाने त्याचा सल्ला ऐकलाच नाही.... आणि त्याने ते फळ खाल्ले... शेवटी जे व्हायचे तेच झाले. तो दोन तोंडी पक्ष्याचा मृत्यू झालाच.

**तात्पर्य** : एकीने राहण्यातच गोडी असते...! त्यात विरोध.... भांडण मुळीच होऊ देऊ नये.

## जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



### जीवन की रोशनी

गुजारे मात्र बरतने के लिये दी गई हैं उनमें लिप्त होने या भोग द्वारा उनका आनंद लेने के लिये नहीं। हमारी सभी समस्याएँ तभी शुरू होती हैं जब हम अंधे बन कर विषयों में डूब जाते हैं और बजाय इसके कि हम सुखों को भोगें, सुख हमें भोग लेते हैं और शारीरिक व मानसिक रूप से हमें पूरी तरह निचोड़ लेते हैं।

हम यह भूल जाते हैं कि सच्चा आनंद मन की अवस्था है जो हमारे अंतर से फूटता है जबकि हम चैतन्य होकर सोये हुए शब्द को जागृत कर लेते हैं और आत्मा को उस अमर जीवन की खुराक देते हैं जो दृश्य और अदृश्य सभी चीज़ों में मौजूद है– समस्त सृष्टि को बनाने और चलाने वाली एकमात्र शक्ति है । भूत, भविष्य और वर्तमान, यह तीनों पूर्ण पुरूष की मज़बूत पकड़ में रहते हैं । पूर्ण पुरूष एक दयालु पिता की भाँति अपने बच्चों को नेकी और अच्छाई की राह दिखाता है जिस पर चल कर वे आत्म-ज्ञान और प्रभु-साक्षात्कार, खुदशनासी और खुदाशनासी के लक्ष्य तक पहुँच जाते हैं, जहाँ पहुँचकर हम प्रभु से एकरूप हो जाते हैं। जिस प्रकार एक अबोध बालक नहीं जान सकता कि उसका पिता उसके लिए कितना कुछ करता है उसी प्रकार एक नया शिष्य इस तथ्य से अनभिज्ञ होता है कि उसका आध्यात्मिक पिता उसकी कितनी संभाल करता है। गुरु के बताये हुए रास्ते पर चल कर वह धीरे- धीरे अंतर के रहस्यों को समझ लेता है जो कदम-कदम पर उसके सामने खुलते जाते हैं:-

शरीर में रहकर, निरीह आत्मा,
क्या जानती हो तुम?
तुम हो दुखी और तुच्छ बहुत,
खुद को जानने के लिये स्वयं ।

कर्मों की विकट और जटिल समस्या को एक संत-सद्गुरु जिस ढंग से हल करता है, वह संक्षेप में इस प्रकार है:- वह अनंत काल से जब से सृष्टि की शुरूआत हुई, जीव के खाते में इकट्ठा हो रहे अव्यक्त और सुप्त कर्मों का भंडार है। कोई भी इनसे बच नहीं सकता जब तक कि वे बाद के अनगिनत जन्मों के अपने आप ही समाप्त नहीं हो जाते (बशर्ते कि उनमें और वृद्धि न हो, जो असंभव सी बात है) इसलिये इस विशाल जमा खाते को समाप्त कर एक पाना नामुमकिन है। तब क्या चेतन और अवचेतन के बीच की दरार और फिर अवचेचन और अचेतन को पृथक करने वाली खाई को पार करने का कोई उपाय नहीं? हर गलती का इलाज है चाहे वह आत्मिक गलती हो या सांसारिक । यदि बीजों को भून दिया जाये तो वे अपनी उर्वरता या अंकुरित होने की क्षमता खो देते हैं और तब उनकी उगने और फल देने की शक्ति समाप्त हो जाती है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग – २)

### अंतरीक बल

गुनगुनाएं। थोड़ा बहुत टी.वी. देख सकते हैं। कविता, कहानी, उपन्यास, जीवनियां और अन्य कोई पुस्तक पढ़ने से मन बदल जाएगा। जब भी थोड़ा सा समय मिले कोई न कोई बुक पढ़ा करो।

पर विजय है। जो सोचा वह उस समय करना ही है। समय का सोच अनुसार प्रयोग करना हमारे में आत्म विश्वास बढ़ाता है। परीक्षा की तारीख फिक्स हो गई। आप दिन रात पढ़ते हैं आप को नींद नहीं

इस से दिमाग तेज होता है। जब पढ़ने को मन न करे तब शिव बाबा आती। वैसे आप को ९ बजे ही नींद आ जाती है। जैसे ही स्टेशन या ईष्ट को ५ बार याद करें। जब भी थोड़ा सा आलस्य मन में आए आने वाला होता है हम अपना बिखरा हुआ समान बांधने लगते हैं। तुरंत ५ बार भगवान को याद करें। जरा सा भी गुस्से की तरंग उठे तुरंत भगवान को ५ बार कहें, आप प्यार के सागर हैं। जरा सा भी

समय हमारी जड़ता को तोड़ कर गतिशील कर देता है। लड़की की बरात आने का समय होता है, लड़की पक्ष के लोगों की भागदौड़ बढ़

काम टालने का विचार आये मन में कहें मैं इसे आज ही करुंगा। जरा जाती है। आप को किसी व्यक्ति के पास १० बजे काम लेने के लिये। सा भी ईर्ष्या का विचार आये मन में ५ बार कहें भगवान आप प्यार पहुचना था, आप १०.३० बजे पहुंचे। आप को उसने काम तो दे के सागर हैं। जरा सा निराशा आये तब ५ बार कहें, आप प्यार के सागर हैं। ऐसे ही मन में दु:ख, रोग, शोक आये तुरंत ५ बार भगवान को याद करें या ५-७ लाइने किसी साकारात्मक चिन्तन वाली बुक के पढ़ें या अव्यक्त मुरली पढ़ें। ऐसा करने से आप का मस्तिष्क तेज होता रहेगा और आप का समय बचेगा। इस बचे समय को कहीं और प्रयोग करें। आप की कक्षा ८ बजे शुरू होती है। आप को इसी समय पर पहुचना है। यह श्रेष्टता व्यक्तित्व की पहचान है। श्रेष्ट व्यक्तित्व समय के साथ चलते हैं। आप कक्षा में देरी से पहुचते हैं तो यह अनुशासनहीनता है। आप का समय प्रबन्धन ठीक नहीं बन पाएगा। आप ने शुभ फैसला किया इस बुक को आज खत्म करना ही है। आप ने फैसला किया आज अमुक समय २ घंटा योग में बैठूंगा । दोपहर को आप का दोस्त आ गया और वह फिल्म देखने का या कोई प्रवचन सुनने का आग्रह करता है। क्योंकि आप ने प्रण किया है आज ही बुक पूरी करनी है अपने मन पर अंकुश लगाए जो फिल्म देखना चाहता है। आप ने निर्णय लिया है इसलिए पढ़ना ही है । यही समय दिया। परंतु उस के मन में आप के प्रति अविश्वास हो गया यह समय का पक्का नहीं है। परीक्षा हाल में समय पर पहुचते हैं। इंटरव्यू में देरी नहीं करते। यदि रेलवे स्टेशन पर देरी से पहुंचेगे तो ट्रेन छूट जाएगी। इस लिये सभी काम समय पर करने की आदत डालो।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

**अ हिरसि आयुरसि सर्वत:**
**प्रतिष्ठाऽसि धाता त्वा ददतु।**
**विधाता त्वा दधातु ब्रह्मवर्चसा भव।।**
**ब्रह्मा बृहस्पतिविष्णु: सोम: सूर्य स्तथा अश्विनौ।**
**भगोऽथ मित्रवरुीवीर ददतु मे सुतम।।**

हे बाळा, तू सूर्यासारखा तेजस्वी हो, तुझ्या येण्याने माझी प्रतिष्ठा वाढेल, तू आमचे सर्वस्व आहेस. विधाता तुझे रक्षण करो।

हे ब्रह्मदेवा, बृहस्पती, विष्णू, सोम, सूर्य, अश्विनकुमार, वरुण देवता, मी तुम्हा सर्वांना विनंती करतो की, आपण मला शूर, उत्तम, सुसंस्कारित व आरोग्यपूर्ण संतती द्यावी. श्लोक –

**जले रक्षतु वरह: स्थले रक्षतु वामन:।**
**आरण्यां नरसिंहश्च सर्वत: पातु केशव:।।**

### गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण

**अर्थ** – पाण्यात वराह रक्षण करो. जमिनीवर वामन रक्षण करो. अरण्यात नरसिंह, तर इतर ठिकाणी श्री केशव रक्षण करो. रामरक्षा स्तोत्र : गर्भावस्थेत मनाला शुद्ध व संस्कारित करण्यासाठी रामरक्षा हे प्रभावी स्तोत्र आहे. बाळामध्ये कुठल्याही प्रकारचे शारीरिक व्यंग निर्माण होऊ नये व त्याचे मन देखील हे शुद्ध व संस्कारित व्हावे, म्हणून प्रभू रामचंद्राला प्रार्थना करावी.

हे रामचंद्रा, माझ्या बाळाला दीर्घायुष्यी चांगलं शिक्षण, निरोगी आरोग्य व शुद्ध सुसंस्कारित मन देऊन त्याचे संरक्षण कर. असे म्हणत रामरक्षेतील पहिले दहा श्लोक म्हणावेत. रामरक्षा स्तोत्रामुळे बाळाचे व स्वत:चे संरक्षण होते. त्याचबरोबर 'राम' हा शब्द वारंवार म्हटल्यामुळे प्रसूतीनंतर बाळ जेव्हा बोलायला लागते. तेव्हा बाळ बोबडे बोलत नाही. बरीचशी मुलं बोबडी बोलतात. 'र' चा उच्चार 'ल' करतात; परंतु, गर्भावस्थेत रामरक्षा ऐकणारे बाळ 'र' चा उच्चार स्पष्ट करतात; म्हणून गर्भसंस्काराच्या वेळेला दहा श्लोक म्हणावेत व इतर वेळेला रोज संध्याकाळी शुभंकरोती म्हटल्यावर रामरक्षा स्तोत्र पूर्ण वाचावे.

**श्री शान्ति रस्तुम् शिवमस्तु जयोस्तु नित्यम्**
**आरोग्यमस्तु नवपुष्टिसमृध्दि रस्तु कल्याणमस्तु शुभम**
**स्वभिक रूद्धिरस्तु दीर्घायुरस्तु कुलगोत्रधन सदास्तु,**

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००




संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने अहिल्यानगर शरात घर घर संविधान अभियान राबविताना प्रकाश खांडकेकर, विजयकुमार मुंडे, सौ. प्रियांका शिंदे, मेहेर लहारे आदी. दुसऱ्या छायाचित्रात घर घर संविधान अभियान राबविताना मनपाचे अधिकारी व कर्मचारी. (छाया – लहू दळवी)

# संविधान अमृत महोत्सव अंतर्गत अहिल्यानगर शहरात 'घर घर संविधान अभियान' राबविणार

नगर – संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने महानगरपालिकेत अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून संविधान उद्देश पत्रिकेचे वाचन करण्यात आले.

भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने शासनाच्या आदेशानुसार पुढील वर्षभर घर घर संविधान अभियान राबविण्यात येणार आहे. अहिल्यानगर महापालिकेत हर घर संविधान अभियानाच्या माध्यमातून संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामूहिक वाचन केले. तसेच येत्या वर्षभरात महानगरपालिके मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे नियोजन यावेळी करण्यात आल्याची माहिती मनपाच्या वतीने देण्यात दिली.

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपण संविधान स्वीकृत केले. २६ जानेवारी १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरु झाली. संविधानाचे महत्व अनेक स्तरांवर असुन भारतीय संविधानात समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य घडविण्याचा व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ति, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, तसेच दर्जा व संधीची समानता प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तिची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता, बंधुता या मूल्यांचा विचार केलेला आहे. सन २०२४–२५ या अमृतमहोत्सवी वर्षात संविधान अमृत महोत्सव सन २०२४–२५ घर घर संविधान साजरा करण्यात येणार आहे.

संविधानाचे महत्व, त्यातील मूल्ये आणि त्याची अंमलबजावणी याबाबत शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये तसेच भावी नागरिकांमध्ये जागरूकता वाढवणे. संविधानातील मूलभूत हक्क, कर्तव्ये, आणि विविध तरतुदींचे शिक्षण देणे, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक न्यायाची भावना रुजवणे. भारतीय संविधानातील समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही मूल्यांचा प्रचार व प्रसार करणे, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विविधतेतून एकता आणि समता या संकल्पनांचा विकास होईल. विद्यार्थ्यांना संविधानाच्या अध्ययनामुळे आणि चर्चेद्वारे त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अधिकारांची जाणीव करून देणे आणि त्यांच्या जबाबदाऱ्यांचे पालन करण्यासाठी प्रेरित करणे. व्यक्तिची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता, बंधुता या मूल्यांचा प्रचार व प्रसार करणे, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना बळकट होईल., या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत येत्या वर्षभरात अहिल्यानगर महानगरपालिका मार्फत शाळा, महाविद्यालय, वसतिगृहे यांच्या दर्शनी भागात संविधानाची उद्देशिका लावणे, शालेय परिपाठात तसेच वसतिगृह प्रार्थनेत दररोज संविधान प्रास्ताविका, उद्देशिकचे वाचन विद्यार्थ्यांकडून करवून घेणे, शालेय वाचनालयात संविधानाच्या किमान पाच प्रती विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करवून देणे, भारतीय संविधानबाबत सर्वसाधारण माहिती देणे, विद्यार्थ्यांना भारतीय संविधानातील प्रमुख प्रकरणे, हक्क, आणि कर्तव्ये यांवर मार्गदर्शन करणे, कार्यशाळांद्वारे विद्यार्थ्यांना संविधानाचे तत्त्वज्ञान आणि मूल्ये समजावून सांगणे, संविधान मुल्ये यावर पथनाट्य तयार करणे, शाळा, महाविद्यालयात संविधानाच्या विविध मुद्यांवर फलक, पोस्टर, आणि प्रदर्शन आयोजित करणे, संविधान दिन कार्यक्रम, संविधानावर आधारित निबंध लेखन, भाषण, वादविवाद, चित्रकला स्पर्धा इत्यादी उपक्रमांचे आयोजन, प्रजासत्ताक दिनी संविधानातील मुल्यांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन व सादरीकरण करण्यात येणार असल्याचेही मनपाच्या वतीने कळविण्यात आले.

यावेळी प्रशांत खांडकेकर, विजयकुमार मुंडे (उपायुक्त), सौ.प्रियांका शिंदे (उपायुक्त), मेहेर लहारे (सहाय्यक आयुक्त), अशोक साबळे (सहाय्यक आयुक्त), श्री. फराटे (सहाय्यक आयुक्त), अनंत लोखंडे (कर्मचारी प्रतिनिधी) व सर्व अहिल्यानगर महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# आरोग्य क्षेत्रातील अभ्यासकांना शोधनिबंध सादर करण्यासाठी 'तीर-२५' पुरस्कार स्पर्धा

नाशिक – दुर्गम भागातील आदीवासी लोकांचे सक्षमीकरण व शैक्षणिक संशोधनाला चालना देण्यासाठी आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन आले आहे. या परिसंवादात TEER–२५ (ट्रायबल एम्पॉवरमेंट ॲण्ड एज्युकेशनल रिसर्च) पुरस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. आरोग्य क्षेत्रातील संशोधकांनी आदिवासी आरोग्य सेवेवर लक्ष केंद्रित करणारे वैज्ञानिक शोधनिबंध स्पर्धेत सादर करावेत. तीर–२५ करीता शोधनिबंध सादर करण्याची अंतीम मुदत २० डिसेंबर असणार आहे.

विद्यापीठाच्या कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) यांनी सांगितले की, दुर्गम भागात आदिवासी समुदायातील लोकांना आरोग्य विषयक अनेक समस्या आहेत. त्यांना देण्यात येणाऱ्याा आरोग्य सुविधा अधिक सक्षम व सुलभ करण्यातसाठी तसेच त्या सुधारण्यासाठी चर्चा होणे गरजेचे आहे म्हणून आरोग्य विद्यापीठ व अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'फिस्ट–२५' या आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

आरोग्य क्षेत्रातील समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय सुचवण्यासाठी जागतिक तज्ञांना एकत्र आणण्याचा 'फिस्ट–२५' उद्देश आहे. तीर–२५ करीता निर्देशित केलेल्या विषयावरील शोधनिबंध शिक्षक, विद्यार्थी, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ आणि आरोग्य व्यवसायिक सादर करु शकतील असे त्यांनी सांगितले.

विद्यापीठाचे प्रती–कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ यांनी सांगितले की, ट्रायबल एम्पॉवरमेंट ॲण्ड एज्युकेशनल रिसर्च म्हणजे 'तीर–२५' स्पर्धा हा अनोखा उपक्रम या परिसंवादाच्या माध्यमातून घेण्यात येणार आहे. तरी इच्छुक संशोधकांनी ट्रायबल हेल्थ ॲण्ड डिसिज, हेल्थकेबर ॲसेस ॲण्ड युटीलायजेशन, ट्रॅडिशनल मेडिसिन ॲण्ड मॉडर्न हेल्थकेअर, ऑक्युपेशनल हेल्थ इन ट्रायबल्स, कल्चरल सेन्सीटिव्हिटी, पॉलिसी इश्यु इन ट्रायबल हेल्थ या विषयावर शोधनिबंध सादर करावेत असे त्यांनी सांगितले.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी सांगितले की, सदर शोधनिबंधाच्या संक्षिप्त गोषवाायाकरीता ३०० शब्दांची मर्यादा देण्यात आली असून शोधनिबंधाचा आकार, पोस्टर टेम्प्लेट आदी बाबत माहिती www.muhsfist25.com संकेतस्थळावर देण्यात आली आहे त्यानुसार शोधनिबंध सादर करावेत असे त्यांनी सांगितले.

याबाबत 'फिस्ट'–२५ चे सचिव डॉ. संजीव चौधरी यांनी सांगितले की, तीर–२५ स्पर्धेत सहभागी स्पर्धकांनी स्पर्धेच्या नियम व अटींचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे. २० डिसेंबर पर्यंत सादर करावेत शोधनिबंध सादर केल्यानुसार सादरीकरण तसेच ॲवॉर्ड पेपर व पोस्टर सेशन करण्यात येईल. याचे तज्ज्ञ परीक्षण समितीकडून परिक्षण करण्यात येईल तरी जास्तीत जास्त संशोधकांनी तीर–२५ करीता abstractmuhsfistgmail.com ई–मेलवर शोध निबंध सादर करावेत.

ते पुढे म्हणाले की, नागपूर येथील ऑल इंडिया इंन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्स आवारातील सभागृहात आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांच्या सहभागातून पहिला परिसंवाद होणार आहे. आरोग्य व तंत्रज्ञानाच्या मदतीने संशोधनाला नवी कलाटणी मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या परिसंवादातील 'तीर'–२५ स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी स्पर्धकांनी ०७१२२७५२९२९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

विद्यापीठातर्फे आयोजित तीर–२५ स्पर्धेकरीता संशोधकांनी शोधनिबंध सादर करावेत असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात येत आहे.



## के. जी. महाविद्यालयात संविधान दिन साजरा

के. जी. महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाच्या परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून संविधान दिनानिमित्त सर्वांना शपथ दिली. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीतील योगदान स्पष्ट करून सर्वांना संविधानाचे पालन करून त्याप्रमाणे आचरण करण्यास सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.चव्हाण सविता यांनी केले. आभार सौ.अमृता मुळे यांनी मानले. याप्रसंगी प्रा. डॉ. वर्षा कीर्तने, सौ. हर्षाली रासकर व विद्यार्थी.

# शिशुगृह अहमदनगर येथे दत्तक जनजागृती कार्यक्रम

नगर – डिस्ट्रिक्ट् प्रोबेशन ॲन्ड आफटर केअर असोसिएशन संचालित शिशुगृह, विशेष दत्तक संस्था अहमदनगर या संस्थेमध्ये दत्तक जनजागृती कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात तालुक्यातील बचत गटाच्या महिलांचा विशेष सहभाग होता. दत्तक प्रक्रिये बाबत सविस्तर माहिती शिशुगृह व्यवस्थापक शीतल प्रभुणे यांनी दिली. समाजातील सर्व घटकापर्यंत दत्तक प्रक्रियेची माहिती प्रसारित करावी असे आवाहन श्री. प्रभुणे यांनी केले.



शिशुगृह येथे दत्तक प्रक्रियेबद्दल जनजागृती कार्यक्रमाप्रसंगी मार्गदर्शन करताना व्यवस्थापिका शीतल प्रभुणे. समवेत विशाल गायकवाड, सी.रिटा, रवींद्र कानडे यांच्यासह बचत गटाच्या महिला सदस्या.

दत्तक प्रक्रियेमधील प्रतिपालकत्व या प्रक्रियेची माहिती CSA संस्थेचे विशाल गायकवाड यांनी दिली व पालकांनी अनाथ मुलांना प्रतिपालकत्व देऊन ६ ते १८ वयोगटातील मुलांना हक्काचे घर मिळवून देण्याचे आव्हान केले. कार्यक्रमाला सेंट नर्सिंग कॉलेज च्या सी. रिटा या उपस्थित होत्या. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिशुगृहाचे सोशल वर्कर रविंद्र कानडे यांनी केले.

# लोकशाही मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी संविधान दिन साजरा करणे आवश्यक

**डॉ. आर. जे. बार्नबास यांचे प्रतिपादन**

नगर – वैयक्तिक हक्काचे संरक्षण करण्यासाठी, शासनाला काम करण्यासाठी एक चौकट प्रस्थापित करण्यासाठी, स्थिरता प्रदान करण्यासाठी, नागरिकांच्या सहभाग प्रोत्साहन देण्यासाठी, अत्याचारापासून नागरिकांना संरक्षण करण्यासाठी, संविधानाची आवश्यकता आहे. भारतीय राज्यघटना न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव याची खात्री देते. ही मुख्यत्वे देशाच्या लोकशाही मूल्यांचे समर्थन करणारी आहे. तसेच जगातील मोठी लिखित राज्यघटना आहे. म्हणून भारतीय संविधान हे महत्त्वपूर्ण आपणासाठी महत्व पूर्ण आहे. देशातील प्रत्येक नागरिकांसाठी हा अभिमानाचा दिवस आहे, कारण भारतातील १४२ कोटी विविधतेने नटलेल्या लोकसंख्येला एका धाग्यात ठेवण्याचे काम राज्यघटनेने केले आहे. या राज्यघटनेमध्ये आपले विविध स्वरूपाचे स्वातंत्र्य, अधिकार आणि कर्तव्य लिखित स्वरूपात देण्यात आलेले आहे. त्यामुळे आपण आपले मत निर्भीडपणे मांडू शकतो. आपल्या मूलभूत अधिकाराचा वापर ढाल म्हणून करू शकतो आणि आपले मूलभूत कर्तव्य जबाबदारीनेपालन करतो. या सर्व गोष्टीसाठी भारतीय 'संविधान दिवस' साजरा करतात, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस यांनी केले.



अहमदनगर महाविद्यालयात संविधान दिन साजरा करताना प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस. समवेत प्रा. डॉ. विलास नाबदे, इतर प्राध्यापक वर्ग.

## अहमदनगर महाविद्यालयात संविधान दिन साजरा

गांधी अभ्यास केंद्र, राज्यशास्त्र विभाग आणि करिअर कट्टा अंतर्गत अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी घटनेच्या 'उद्देश पत्रिकेचे वाचन प्रा.डॉ. विलास नाबदे (राज्यशास्त्र विभाग) यांनी केले.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य दिलीपकुमार भालसिंग, प्रा.डॉ. नोयल पारगे, प्रा.डॉ. प्रितमकुमार बेदरकर, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. विनीत गायकवाड, कायम विनाअनुदान विभाग विभाग प्रमुख प्रा.डॉ. सय्यद रज्ञाक, महाविद्यालयाचे रजिस्टर पिटर चक्रनारायण, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ. भागवत परकाळ, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. पोपट सिनारे आणि राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रो. सुधीर वाडेकर आणि महाविद्यालयातील विविध विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, समन्वयक, शिक्षकेतर कर्मचारी गांधी अध्ययन केंद्राचे कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी विद्यार्थी विकास मंडळ, करिअर कट्टा, राज्यशास्त्र विभाग व गांधी अध्ययन केंद्राच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## संविधान एका समाजापुरते नसून, सर्व भारतीयांचा

**सुनिल सकट यांचे प्रतिपादन, डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन, संविधान दिन चिरायु होवो... च्या घोषणा**

नगर – डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधानामुळे जगाला प्रगल्भ लोकशाहीची प्रचिती आली आहे. राजेशाही संपवून सर्वसामान्य मतदारांच्या हातात देशाची सूत्रे आली व संविधान एका समाजापुरते नसून, सर्व भारतीयांचे आहे. संविधानाने देशात समता, बंधुता व स्वातंत्र्यता प्रस्थापित झाली असल्याची भावना सुनिल सकट यांनी व्यक्त केली.



संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना सुनील सकट आदी.

संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्केटयार्ड समोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त सुनिल सकट यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी ग्राहक मंचचे जिल्हाध्यक्ष भैय्या पठाण, अशोक खंडागळे, विशाल भिंगारदिवे, सुबोध वाघचौरे, पोपट जाधव, रशिद शेख, विशेष कुमार, संजय जगताप, बाळासाहेब घोरपडे, अशोक भोसले, प्रकाश साळवे आदी उपस्थित होते.

संविधान दिन चिरायु होवो.... भारतीय संविधानाचा विजय असो... च्या यावेळी कार्यकर्त्यांनी घोषणा दिल्या. तसेच मुंबई येथे झालेल्या २६–११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

## राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने नगर येथील प्रसाद शिंदे सन्मानित



नगर – शैक्षणिक क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात, आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी कार्य करणारे प्रसाद शिंदे यांना राया क्रांतिकारक फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. फाऊंडेशनचे संस्थापक कृष्णा गोहिरे, आयोजक नामदेव जाधव यांनी सांगितले की सामाजिक कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील विविध विभागांतील व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो.

अहिल्यानगर येथील प्रसाद शिंदे यांना फाऊंडेशन माध्यमातून देण्यात येणार राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार देताना विशेष आनंद होत आहे. श्री. शिंदे यांच्या माध्यमातून शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी अविरत कार्य चालू आहे. शिक्षकांना न्याय मिळावा म्हणून त्यांच्या माध्यमातून आंदोलने केली आहे. रायझिंग ट्रायबल फाउंडेशन या संस्थेच्या माध्यमातून शिंदे विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात त्यामध्ये रक्तदान शिबिर, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपण, तसेच आदिवासी बांधवांसाठी विशेष कार्य करतात त्यामध्ये आदिवासी बांधवांना घरकुले मिळावेत, जातीचे दाखले मिळावेत, मुलांना शिक्षण मिळावे, महिलांना रोजगार मिळावा, विविध योजनांचा फायदा आदिवासी बांधवांना मिळवून देण्यासाठी कार्य सुरू आहेत.

श्री. शिंदे यांचे कार्य अतिशय कौतुकास्पद असल्याचे आयोजकांनी सांगितले की महाराष्ट्रातून २१ व्यक्तींना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून पुरस्कार सोहळा २४ नोव्हेंबरला नाशिक येथे पार पडला

# जिल्हा न्यायालयात वकीलांनी केले संविधान पूजन

**लोकशाही संरक्षण कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी सर्वच वकिलांची मदत घेण्याचा निश्चय**

नगर – येथील जिल्हा न्यायालयात अहमदनगर वकील संघाच्या वतीने संविधान दिनानिमित्त भारतीय संविधानाचे पूजन करुन संविधानाच्या उद्देशिकेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. उपस्थित वकील मंडळींनी लोकशाही संरक्षण कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी सर्वच वकिलांची मदत घेण्याचा निश्चय केला. तर भारतीय संविधान मध्ये वुई चा अर्थ आपण सर्व, आपणा सर्वांसाठी आणि आपल्या सर्वांचे गणतंत्र या स्वरूपात राबवण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



जिल्हा न्यायालयात संविधानाचे पूजन करताना वकिल संघाचे उपाध्यक्ष ॲड. शेडाळे व इतर वकिल वर्ग.

वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड. महेश शेडाळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संविधान पूजन कार्यक्रमासाठी ॲड. सुरेश लगड, ॲड. कारभारी गवळी, ॲड. धनलक्ष्मी एस. नायडू, वकील संघाचे सचिव ॲड. संदीप शेळके, सहसचिव ॲड. संजय सुंबे, ॲड. गौरव दांगट, ॲड. रामेश्वर कराळे, ॲड. अरुण राशिनकर, ॲड. अंजन बचाटे, ॲड. भाऊ अवसरकर, ॲड. रवींद्र रणसिंग, ॲड. सागर निंबाळकर, ॲड. चंद्रशेखर उबाळे आदी उपस्थित होते.


भारतीय समाज सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या विभागलेल्या स्वरूपामध्ये गेले शेकडो वर्ष अस्तित्वात आहे. त्यातून महिलांना गेली अनेक वर्षे आणि अल्पसंख्याक समाजातील लोकांना देखील देशाच्या राजकारभारामध्ये पुरेशी संधी उपलब्ध होत नाही. इंग्लंडच्या अलिखित घटनेवर आधारित शासन पद्धती आज देखील भारतात लागू आहे. धर्म आणि राजकारणाचा वापर आम्ही, आमचे आणि आम्हाला यासाठी काही हितसंबंधी मंडळी करत आहेत. परंतु या सर्व बाबींचे रूपांतर आपण सर्व, आपणा सर्वांसाठी आणि आपल्या सर्वांचे मध्ये करण्यासाठी अहमदनगर वकील संघासह सर्व वकीलांची मदत घेण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतातील लोकशाही बौद्धिक दिव्यांग अजिबात असता कामा नये. भारतातील सर्व शासन– प्रशासन हे उन्नत चेतनेवर आधारित असले पाहिजे असा एकजुटीचा निर्णय देखील वकील संघाने घोषित केला. कोणत्याही धार्मिक किंवा पंथाच्या ग्रंथापेक्षा भारतीय संविधान सर्वश्रेष्ठ आहे. त्यामध्ये देशांमध्ये जात, धर्म, पंथ याला काही एक थारा न देता वकिलांनी त्यांना उपलब्ध असलेल्या आणि कायद्याने प्राप्त झालेल्या व्यापक अधिकाराचा वापर तमाम जनतेसाठी विशेषतः महिलांवरील अत्याचार दूर करण्यासाठी आणि दुबळ्या घटकांचे संरक्षण करण्यासाठी केला पाहिजे, असे देखील बैठकीमध्ये जाहीर करण्यात आले.

उपाध्यक्ष ॲड. महेश शेडाळे म्हणाले की, वकील संघ समाजावर होणारा अन्याय दूर करण्यासाठी प्रत्येक वेळेला पुढे राहणार आहे. या देशातील लोकशाही अधिक गतिमान, शक्तिमान आणि उन्नत करण्यासाठी आणि लोकशाही संरक्षण कायदा आणण्यासाठी वकीलांचा सक्रिय प्रयत्न राहणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी वकील संघाचे सचिव ॲड. संदीप शेळके यांनी लोकशाही संरक्षण कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी सर्वच वकिलांची मदत घेण्याचा निश्चय व्यक्त केला. ॲड. संजय सुंबे सचिव यांनी सूत्रसंचालन केले.

# महात्मा जोतीराव फुले



भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांचा आज स्मृतिदिन. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचर दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'सर्वसाक्षी जगतप्ती। त्याला नकोच मध्यस्ती।। ' हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की

***विद्येविना मती गेली । मतिविना नीती गेली।***
***नितीविना गती गेली । गतिविना वित्त गेले ।***
***वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।***

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १९४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या. शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप वविरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्य पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभांगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णी यांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



निमगाववाघा (ता.नगर) येथे नेहरू युवा केंद्र, श्री नवनाथ युवा मंडळ व नवनाथ विद्यालयाच्यावतीने निघालेल्या संविधान जागर रॅलीमध्ये सहभागी झालेले ग्रामस्थ. या प्रसंगी मुख्याध्यापक उत्तम कांडेकर यांनी हिरवा झेंडा दाखविला.

## संविधान दिनानिमित्त निघाली संविधान जागर रॅली

नगर - निमगाव वाघा (ता. नगर) येथे नेहरु युवा केंद्र, श्री नवनाथ युवा मंडळ व नवनाथ विद्यालयाच्या वतीने संविधान जागर रॅली काढण्यात आली. संविधान दिनानिमित्त निघालेल्या या रॅलीने ग्रामस्थांचे लक्ष वेधले. भारतीय संविधानाचा विजय असो...च्या घोषणा विद्यार्थ्यांनी दिल्या.

गावातील नवनाथ विद्यालयापासून निघालेल्या रॅलीचे प्रारंभ मुख्याध्यापक उत्तम कांडेकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, युवा मंडळाचे अध्यक्ष संदिप डोंगरे, सचिव प्रतिभा डोंगरे-खोडदे, प्रमोद थिटे, तेजस केदारी, तृप्ती वाघमारे, भानुदास लंगोटे, मयुरी जाधव, प्रियंका डोंगरे-ठाणगे, साई श्रध्दा फाऊंडेशनच्या अध्यक्षा अर्चना परकाळे, मंदा साळवे आदींसह शालेय शिक्षक, विद्यार्थी संविधान जागर रॅलीत सहभागी झाले होते.

प्रारंभी मुंबई येथे झालेल्या २६-११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. तर संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन यावेळी करण्यात आले.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, संविधानाने देशात मनुष्याला मनुष्य म्हणून जगण्याचा अधिकार मिळाला असून, संविधानामुळे जगाला प्रगल्भ लोकशाहीची प्रचिती आली असल्याचे त्यांनी सांगितले.

मंदा साळवे यांनी संविधानाने राजेशाही संपुष्टात येऊन सर्वसामान्य मतदारांच्या हातात देशाची सुत्रे आली. संविधानाने देशात समता, बंधुता व स्वतंत्र्यता प्रस्थापित झाल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय, साई श्रध्दा फाऊंडेशन यांचे सहकार्य व नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी संकल्प शुक्ला, लेखापाल सिध्दार्थ चव्हाण, रमेश गाडगे यांचे मार्गदर्शन लाभले.



## जिल्हा प्रशासनाच्यावतीने संविधान दिन साजरा


जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी भारतीय संविधानाची माहिती दिली, तसेच संविधानाच्या उद्देशीकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी प्रवीण महाजन, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल, पाटील, उपजिल्हाधिकारी हिरामण झिरवळ, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर तसेच संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## चेंडे डेंटल क्लिनिकमध्ये जिल्ह्यात प्रथमच ए आय तंत्रज्ञानाचा वापर

### केडगावमध्ये दातांवरील उपचार अधिक जलद व सुटसुटीत



डॉ. विवेकानंद चेडे



डॉ. पल्लवी चेडे

नगर - केडगाव येथील चेडे डेंटल केअर व इम्प्लांट सेंटरमध्ये AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानाचा वापर करून एक तासात दातांची कॅप तयार केली जाणार आहे. जास्तीत जास्त चार तासात रुग्णावरती रूट कॅनलचे पुर्ण उपचार करून त्याला घरी जाता येईल, अशा पद्धतीचे आधुनिक तंत्रज्ञान व मशिनरी जिल्ह्यात प्रथमच उपलब्ध असल्याची माहिती दंतरोग तज्ञ डॉ. विवेकानंद चेडे व डॉ. पल्लवी चेडे यांनी दिली.

सध्याच्या धावपळीच्या युगात वेळेचे महत्व खुप वाढले आहे. रूट कॅनल, तुटलेल्या दातावरती कॅप बसवणे, वेडे वाकडे दात सरळ करणे यासह दातांवरील विविध प्रकारच्या उपचारासाठी पारंपारिक पद्धतीत चार दिवसांपेक्षा जास्त दिवस लागू शकतात. धावपळीच्या जीवन पद्धतीत उपचारासाठी वेळ काढणेही रुग्णांना अवघड झाले आहे. चेडे डेंटल केअर व इम्प्लांट सेंटर मध्ये जागतिक दर्जाचे उच्च तंत्रज्ञान युक्त AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञाना मुळे दातांवरील वेगवेगळ्या उपचारासाठी वारंवार दवाखान्यात जाण्याची गरज पडणार नाही. पुण्या मुंबईच्या धर्तीवर नगर जिल्ह्यात प्रथमच केडगाव मध्ये उच्च तंत्रज्ञान युक्त दंत उपचार सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत. CEREC प्रणाली द्वारे आता दातांवरील कॅप, डेंटल लॅमिनेट, इन्ले औनले बनविणे अधिक जलद, सोपे व सुकर झाले आहे. सध्या प्रचलित असलेल्या दाताच्या उपचारासाठी मोठा कालावधी लागतो. केडगावच्या चेडे क्लिनिकमध्ये मात्र काही तासात संपूर्ण उपचार पूर्ण होणार असल्यामुळे सध्या मोठ्या शहरांमधील अनेक रुग्ण केडगावला दातांवरील उपचारासाठी येत आहेत.

या उपचार पद्धतीच्या फायद्या बाबत सांगताना डॉ. चेडे म्हणाले, की एका लग्नाळू मुलीच्या पसंती साठी पाहुणे येणार होते. अचानकपणे पाय घसरून पडल्यामुळे मुलीचे पुढचे दोन दात पडले होते. दुसऱ्या दिवशी पाहुणे येणार असल्यामुळे मुलीचे आई-वडील चिंतेत पडले होते. डॉ. चेडे यांनी अवघ्या दोन तासात त्या मुलीच्या दातावरती उपचार करून तुटलेल्या दातावरती कॅप बसून सर्व दात पूर्ववत केले. दुसऱ्या दिवशी पाहुणे आले पसंती झाली व उत्साहात लग्न समारंभ पार पडला. हा आयुष्यातील अविस्मरणीय क्षण असल्याचे डॉ. चेडे म्हणाले.

केडगाव येथील चेडे डेंटल केअर व इम्प्लांट सेंटरचे संचालक डॉक्टर विवेकानंद चेडे यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दंत वैद्यकीय परिषदांमध्ये सहभागी होऊन प्रबंध सादर केले आहेत. त्याचप्रमाणे जागतिक पातळीवरील अद्ययावत तंत्रज्ञानाचा नगर जिल्हा सह राज्यातील अनेक दंतवैद्यांना याचा लाभ मिळवून देण्यासाठी ते कायम प्रयत्नशील असतात. दर शनीवारी व रविवारी जिल्हा सह राज्यातील अनेक दंतरोगतज्ञ खास प्रशिक्षण घेण्यासाठी येत असतात.

## खेळाडूंनी शालेय जीवनापासूनच खेळाचा सराव केल्यास राष्ट्रीय स्पर्धेमध्ये खेळण्याची संधी मिळेल

### ॲड. अनंत फडणीस यांचे प्रतिपादन



सीताराम सारडा विद्यालयाच्या क्रीडा मेळाव्याचे हवेत फुगे सोडून उद्घाटन करताना राखीव पोलिस निरीक्षक उमेश परदेशी. हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड. अनंत फडणीस आदी.

### सीताराम सारडा विद्यालयाच्या क्रीडा मेळाव्याचे उद्घाटन

नगर - सीताराम सारडा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धांमध्ये उत्तम यश संपादन केले आहे. खेळाडूंनी शालेय जीवनापासूनच खेळाचा सराव करून राष्ट्रीय खेळामध्ये सहभागी होण्याची संधी मिळवावी. शालेय जीवनापासूनच क्रीडा स्पर्धेत सहभागी होऊन शाळेच्या नावलौकिकात भर घालावी. विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याची संधी निर्माण झाली आहे. खेलो इंडिया यासारख्या खेळांमध्ये खेळाडूंना चांगली संधी निर्माण झाली आहे. या संधीचे सोने करून खेळाडूंनी शाळेच्या व देशाच्या नवलौकिकात भर घालावी, असे प्रतिपादन हिंदसेवा मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड.अनंत फडणीस यांनी केले आहे.

सारडा महाविद्यालयाच्या प्रांगणात हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयाच्या वार्षिक क्रीडा मेळाव्याचे उद्घाटन राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी यांच्या हस्ते हवेत फुगे सोडून करण्यात आले.

याप्रसंगी हिंदसेवा मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड.अनंत फडणीस, पेमराज सारडा कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी, सीताराम सारडा विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा, सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित, ड्रील ट्रेनर दाभाडे, शालेय समिती सदस्य संजय मुदगल, मुख्याध्यापक विठ्ठल ढगे, स्नेहसंमेलन प्रतिनिधी सौ. वृषाली जोशी, श्री.बोडखे, श्री. घायाळ, अनंत जोशी आदी उपस्थित होते.

राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी म्हणाले, मोबाईलच्या जमान्यात मुलांचे खेळ हरवले आहेत. शालेय जीवनात विद्यार्थ्यांनी मैदानी खेळ खेळावेत. क्रीडा स्पर्धेत सहभागी व्हावे. खेळाडूंनी देशाच्या नावलौकिकात भर घातली आहे. विविध खेळांमध्ये सहभागी होऊन शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात सहभाग नोंदवावा.

मुख्याध्यापक विठ्ठल ढगे म्हणाले, विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात यश संपादन करावे. यासाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणात क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. शाळेतील विद्यार्थी प्रत्येक खेळात सहभागी होऊन शाळेच्या नावलौकिकात भर घालत आहेत.

शालेय समिती सदस्य संजय मुदगल यांनी मुलांमध्ये खेळाची रुची वाढवण्यासाठी दोन कॅरम बोर्ड दिले. संविधान वाचन श्रीमती क्रांती मुंदणकर यांनी केले. क्रीडाज्योत दिपक आरडे, अनुपम शिंदे व शाळेतील खेळाडू यांनी आणली. परिचय क्रीडाशिक्षक सुनिल कुलकर्णी, सूत्रसंचालन सौ.दिपाली लगड यांनी केले तर आभार पर्यवेक्षक गोविंद धर्माधिकारी यांनी मानले. क्रीडा मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी अशोक डोळसे, नितीन केणे, अमोल कदम व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.



संविधान दिन अमृत महोत्सवानिमित्त नगर जिल्हा वाचनालयात संविधान शपथ, चर्चासत्र व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संचालिका शिल्पा रसाळ, संचालक किरण अग्रवाल, ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल, रसिक वाचक अनिल झंवर, प्रभाकर सुरकुटला, किशोर उत्तरकर, पल्लवी कुक्कडवाल.

## भारतीय संविधान व जिल्हा वाचनालयात असणारी त्याची मुख्य प्रत अभिमानास्पद

### वाचनालयाचे दिलीप पांढरे यांचे उद्गार

नगर - भारतीय संविधान हे प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद आहे. राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर व घटना समिती सदस्यांनी प्रचंड मेहनत घेऊन आम्हा भारतीयास आमचे हक्क व कर्तव्य संविधानाच्या माध्यमातून मिळवून दिले. या संविधानाच्या मुख्य प्रतिपैकी एक प्रत अहमदनगर जिल्ह्यात वाटण्यात उपलब्ध आहे. हा अमूल्य ठेवा नगरमधील वाचकांसाठी व अहिल्यानगर जिल्हा वाचनालयासाठी अभिमानास्पद असल्याचे उद्गार वाचनालयाचे उपाध्यक्ष दिलीप पांढरे यांनी काढले.

संविधान दिन अमृत महोत्सवानिमित्त नगर जिल्हा वाचनालयात आयोजित संविधान शपथ, चर्चासत्र व ग्रंथ प्रदर्शनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संचालिका शिल्पा रसाळ, संचालक किरण अग्रवाल, ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल, रसिक वाचक अनिल झंवर, प्रभाकर सुरकुटला, किशोर उत्तरकर, पल्लवी कुक्कडवाल उपस्थित होते.

यावेळी संविधाना त संविधानास ७५ वर्ष झाल्यानिमित्त संविधान अमृत महोत्सव उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. यानिमित्त वाचनालयात उपलब्ध असलेल्या संविधान प्रतीचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा रसाळ तर आभार ग्रंथपाल अमोल इथापे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सौ. वर्षा जोशी, संकेत पाठक, संजय गाडेकर, नितीन ढाकणे यांचे सहकार्य लाभले.

## दुबईला होणाऱ्या जिजाऊ ब्रिगेडच्या आंतरराष्ट्रीय अभ्यास दौऱ्यासाठी अनिता काळे यांची निवड



नगर - मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा तथा जिजाऊ व्याख्यात्या अनिता काळे पाटील यांची दुबई येथे होणाऱ्या जिजाऊ ब्रिगेडच्या आंतरराष्ट्रीय अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. महिला सक्षमीकरण व महिलांचे संघटन करुन सुरु असलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांची या अभ्यास दौऱ्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातून जिजाऊ ब्रिगेडच्या आंतरराष्ट्रीय अध्यक्षा मयुराताई देशमुख, प्रा. शारदा जाधव व नगरच्या अनिता काळे या तीन महिलांची नियुक्ती करण्यात आली आहे. काळे या जिल्ह्यातून निवड होणाऱ्या एकमेव महिला आहेत. जिजाऊ ब्रिगेडचे आंतरराष्ट्रीय अधिवेशन २० ते २५ जानेवारी २०२५ दरम्यान अबुधाबी (दुबई) येथे होत आहे. यामध्ये आंतरराष्ट्रीय अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये महिलांची सामाजिक परिस्थिती व भविष्यातील वाटचाल यासंदर्भात विचारमंथन होणार आहे.

अनिता काळे या भिस्तबाग जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका असून, सर्वसामान्य घटकातील मुला-मुलींना विद्या दानाचे पवित्र कार्य करुन शालेय मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यासाठी ज्युदो व लाठी-काठीचे प्रशिक्षण मोहिम चालवित आहे. महिला सक्षमीकरणाचे कार्य करुन त्यांनी उत्तम प्रकारे महिलांचे संघटन केले आहे.

व्याख्यानातून राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आणि विचार घराघरात पोहचवून सक्षम पिढी घडविण्याचे त्यांचे कार्य सुरु आहे. जिजाऊ ब्रिगेडच्या आंतरराष्ट्रीय अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाल्याबद्दल मराठा समन्वय परिषद व आंतरराष्ट्रीय जिजाऊ ब्रिगेडच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## रक्ताचा तुटवडा पाहता प्रत्येकाने रक्तदान करावे

### पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांचे प्रतिपादन; पोलिस अधिकारी व अंमलदारांनी केले रक्तदान, मुंबई दहशतवादी हल्लयात शहिदांना श्रद्धांजली



२६/११ मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना तोफखाना पोलिस ठाण्यात रक्तदान करून श्रद्धांजली वाहण्यात आली.

नगर - तोफखाना पोलीस स्टेशनच्या वतीने मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्लयातील शहीदांना बलिदान दिवसानिमित्त श्रद्धांजली वाहण्यात आली. रक्ताचा तुटवडा पाहता प्रत्येकाने रक्तदान करणे आवश्यक आहे. रक्तदान ही काळाची गरज आहे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे, असे प्रतिपादन तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी केले आहे.

तोफखाना पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र पोलीसांनी दिलेल्या बलीदान दिवस २६/११ मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्लयात शहीद पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. तसेच महाराष्ट्र पोलिसांनी दिलेल्या बलिदान दिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराला पोलीस स्टेशन तोफखाना येथील पोलीस अधिकारी, पुरुष व महिला अंमलदार यांचे सहकारी, पत्रकार मंडळीनी रक्तदान केले आहे.

या रक्तदान शिबिरासाठी पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांचे मार्गदर्शना खाली तोफखाना पोलीस स्टेशनचे पो.निरीक्षक आनंद कोकरे, पो.उपनिरीक्षक शैलेश पाटील, पो. उपनिरीक्षक अमोल गायधनी, पोहेको सुनिल शिरसाट, पोहेको अहमद इनामदार, पोहेको संतोष गर्जे, पो.कॉन्स्टेबल शफी शेख व अनेक अधिकारी, अंमलदार यांनी रक्तदान केले असुन रक्त संकलनाचे कार्य जनकल्याण रक्तपेढीने केले.

रक्तदान शिबिरात ५५ पोलिसांनी रक्तदान केले. जनकल्याण रक्तपेढीचे श्रीमती सोनाली खांडरे, डॉ. ओजस मनोत, मनीषा जोशी, श्रीमती गया चव्हाण, प्रियंका आडागळे, यादव काका यांनी सहकार्य केले आहे.



## आस वळीवाची...

असे बरसते ऊन
तृणही न राहिले एक
भेगाळल्या या धरेचे
क्लांत नि:श्वास ऐक
रे घना आता
विलंब नको पळाचा
नभी दाटून कुंभ
वर्षाव हो वळीवाचा

# कॅलिडोस्कोप

## टेस्लाची कार बदलली बैलगाडीत!

एका व्यक्तीने चक्क ४० लाख रुपये किमतीची टेस्ला कंपनीची कार बैलगाडीमध्ये बदलली आहे. 'टेस्ला'ची कार जगभरामध्ये चर्चेत आहे. या कारला तिच्या फीचर्समुळे जगभर पसंती दिली जाते, तसेच या गाडीला खूप मागणी आहे; पण आता चीनमधील एक व्यक्ती याच टेस्ला कारवर इतकी नाराज झाली, की त्याने टेस्लाच्या कारचे बैलगाडीत रूपांतर केले.

चीनमधील एका व्यक्तीने सेकंड हँड टेस्ला मॉडेल ३ विकत घेतले. तिची किंमत १०१,००० युआन (११ लाख रुपये) आहे; परंतु ती खरेदी केल्यानंतर त्याला समजले की, ते चार्ज करणे शक्य नाही. त्याच्या या तक्रारीवर कोणताही तोडगा न निघाल्याने त्याने संतप्त होऊन बैलासह गाडी



ओढून निषेध केला. चीनमधील टेस्लाच्या अधिकृत वेबसाइटनुसार, चीनमध्ये या मॉडेलची सध्याची किंमत ३३५,९०० युआन (सुमारे ४० लाख रुपये) पासून सुरू होते. कार घेतल्यानंतर, जेव्हा ती व्यक्ती गाडी चालवत होती, तेव्हा त्याला समजले की, कारमध्ये काही समस्या आहे. त्यामुळे ती चार्ज होऊ शकली नाही. गुआजी नावाच्या कंपनीच्या मदतीने या व्यक्तीने कार खरेदी केली होती. गुआजीने २३ ऑक्टोबर रोजी एक अधिकृत निवेदन जारी केले की कार विकणारा एक कार डीलर होता आणि त्याने सुमारे ३० वेळा हीच कार विक्री आणि खरेदी केली होती.

## हनीट्रॅपच्या माध्यमातून एड्स्!

आजकाल हनी ट्रॅपच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. त्याच्या जाळ्यात अनेक तरुण–तरुणी अडकले. नुकतीच उत्तराखंडमधून एक धक्कादायक बातमी समोर आली. ड्रग्जच्या आहारी गेलेल्या प्रियकरासह एकूण २० जण एचआयव्ही पॉझिटिव्ह झाले. हा प्रकार उघड झाल्याने खळबळ उडाली आहे.




उत्तराखंडमधील नैनिताल जिल्ह्यातील रामनगर भागात ही घटना उघडकीस आली. अवघ्या पाच महिन्यांमध्ये १९ जणांना एचआयव्हीची लागण झाल्याचे आढळून आले. मिळालेल्या माहितीनुसार, गुलरघाटी परिसरातील १७ वर्षीय तरुणीला अंमली पदार्थांचे व्यसन होते. ती ड्रग्ससाठी हतबल व्हायची तेव्हा ती मुलांना बोलावायची. तिच्या संपर्कामुळे अनेक मुलांना एचआयव्हीची लागण झाली. यामध्ये १५ महिलांचा समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे.

नैनिताल जिल्ह्यामध्ये एचआयव्ही पॉझिटिव्ह प्रकरणे वाढत आहेत आणि रामनगर सर्वात वाईट आहे. रामनगरमध्ये १७ महिन्यांत ४५ लोक एचआयव्ही पॉझिटिव्ह आढळले. एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत १९ जणांना एचआयव्हीची लागण झाली आहे. यामध्ये ३० पुरुष आणि १५ महिलांचा समावेश आहे. ३० पुरुषांपैकी २० तरुणांना सिडिक पदार्थ सेवन केलेल्या आईच्या संपर्कात आल्याने संसर्ग झाला होता. मिळालेल्या माहितीनुसार, रामनगर येथे राहणारी अल्पवयीन मुलगी सिड्युक्त पदार्थ प्राशन करून शहरातील कोणत्याही गल्लीबोळात बिनधास्तपणे फिरताना दिसत आहे. ड्रग्जसाठी पैसे गोळा करण्यासाठी तिने लोकांना आमिष दाखवून शरीरसंबंध करायला लावले.

## डेटवर जाणे पडले महागात!

गाझियाबादमधील एक तरुण डेटवर गेल्यावर फसवणुकीचा बळी ठरला आहे. एका व्यक्तीने सांगितले, की तो डेटला जाणार होता. मेसेजमध्ये त्याला कौशांबी या मेट्रो स्टेशनवर भेटायला बोलावले. मात्र तिथे त्याच्यासोबत असे काही घडले, ज्यामुळे त्याचा जीव धोक्यात आला. स्टेशनवरून त्या व्यक्तीला कौशांबी हॉटेलच्या पहिल्या मजल्यावर असलेल्या टायगर कॅफेमध्ये नेण्यात आले. कॅफेमध्ये पोहोचल्यावर, त्या



कनेक्टिव्हिटी होती ना कोणताही साइनबोर्ड. परिस्थिती गडबड असल्याचे लक्षात येताच त्याने ताबडतोब त्याचे लाईव्ह लोकेशन आपल्या मित्रासोबत शेअर केले आणि मेसेजद्वारे संपूर्ण परिस्थिती सांगितली. नंतर कॅफेच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्यासमोर १६,४०० रुपयांचे बिल ठेवले. जे मुलीने ऑर्डर केलेल्या कोल्ड्रिंकचे बिल होते. त्यासाठी त्याने नकार दिल्याने कर्मचाऱ्यांनी त्याला बाहेर जाण्यापासून रोखले आणि जबरदस्तीने ५० हजार रुपयांची मागणी केली. चांगली गोष्ट म्हणजे त्याने सर्व परिस्थिती आपल्या मित्राला सांगितली होती. त्यामुळे त्याच्या मित्राने पोलिसांशी संपर्क साधला आणि लगेच कारवाई करण्यात आली. या कारवाईत डेटिंग घोटाळ्यात सहभागी असलेल्या एका गटाचा पर्दाफाश करण्यात आला. त्यांनी वेगवेगळ्या डेटिंग ॲप्सवर प्रोफाइल तयार केले होते. ती अज्ञात पुरुषांना टायगर कॅफेमध्ये घेऊन जायची, जिथे त्यांच्याकडून खाण्यापिण्यासाठी मोठ्या प्रमाणात पैसे आकारले जात होते. यानंतर संपूर्ण रक्कम भरेपर्यंत लोकांना ओलीस ठेवण्यात येत होते.

## इथे आहेत मृतदेह आणि ममी

एखाद्या संग्रहालयात गेल्यावर ममी आणि मृतदेहांचं प्रदर्शन बघायला मिळालं तर? इटलीतल्या सिलसिली या बेटावरच्या पालेर्मो कॅपुचिन संग्रहालयात ममी आणि मृतदेहांचा संग्रह करण्यात आला आहे. त्यामुळे या संग्रहालयात जरा जपूनच पाऊल ठेवायला हवं. इथे आठ हजार मृतदेह आणि १२५२ ममी आहेत. सोळाव्या शतकात ख्रिस्ती भिक्षूकांनी या परिसरात मृतदेह पुरण्याचं तसंच ममी तयार करण्याचं काम सुरु केलं होतं. आज जिथे संग्रहालय आहे. त्याचं रूपांतर संग्रहालयात करण्यात आलं. या मृतदेहांना ममीच्या माध्यमातून सुरक्षित ठेवण्यात आलं. १९२० पासून या भागात मृतदेह पुरण्याचं काम बंद करण्यात आलं आणि संग्रहालयाच्या निर्मितीला वेग आला. या विचित्र संग्रहालयाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी ख्रिस्ती भिक्षुकांकडेच आहे. यातल्या काही ममी पूर्ण अवस्थेत आहेत तर काहींची अवस्था बिकट झाली आहे. इजिप्तमधल्या ममी खूप प्रसिद्ध आहेत. मात्र ममी हा शब्द अरबी भाषेतल्या मुमियापासून तयार झाला आहे. मुमिया म्हणजे मेणाच्या लेपात सुरक्षित ठेवण्यात आलेल्या चीजवस्तू. ममी तयार करण्यासाठी ७० दिवसांचा कालावधी लागतो. अशा या वस्तूसंग्रहालयात पर्यटकांना थरारक अनुभव घेता येईल हे नक्की.



## पेट्रोल टँकरचा गाईंच्या तस्करीसाठी वापर



गाय तस्करांनी गाईंची तस्करी करण्यासाठी पेट्रोल टँकरचा वापर केला आणि त्यात गायी नेण्यास सुरुवात केली. ही माहिती मिळताच बुलडोझरने कंटेनर फोडला असता लोकांना धक्का बसला. पेट्रोलच्या टँकरमधून गायींची वाहतूक केली जात होती. या ट्रकच्या मागील बाजूस एक पेट्रोल कंटेनर जोडला आहे. तो पाहिल्यानंतर कोणालाही वाटेल, की या ट्रकमधून पेट्रोल किंवा डिझेलचा पुरवठा होत आहे; पण याठिकाणी गाय तस्करांनी गाईंची बेकायदेशीर वाहतूक करण्यासाठी पेट्रोल कंटेनरमध्ये त्यांना भरले. बुलडोझरच्या सहाय्याने कंटेनर फोडण्यात आले. आतील गायी पाहून लोक हैराण झाले. बुलडोझरच्या सहाय्याने कंटेनर तोडून गायींची सुटका करण्यात आली. बुलडोझरने कंटेनर फोडताच त्यामध्ये गायींचा कळप होता. त्यांना जबरदस्तीने बांधून घेऊन जात होते. डब्यात ज्या पद्धतीने गायी लपवून ठेवण्यात आल्या आहेत, त्यानुसार हे गोवंश तस्करीचे प्रकरण असून त्याबद्दल लोकांमध्ये तीव्र नाराजी आहे. पोलिसांनी आरोपींची नावे उघड करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.


## बिनची कमाल

चीनमधला एक धावपटू बेई बिन याने अनोखा विक्रम केला. त्याने उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंतचं २४,११० किलोमीटरचं अंतर धावून पूर्ण केलं. म्हणजे तो अंटार्टिका खंडातून आर्टिक खंडात पोहोचला. हे अंतर त्याने ४३३ दिवसांमध्ये पूर्ण केलं. बेई प्रत्येक दिवशी सरासरी ५६ किलोमीटर अंतर धावला. २४,११० किलोमीटर अंतर म्हणजे ४२ किलोमीटरच्या ५७४ मॅरेथॉन स्पर्धांमध्ये धावणं! या काळात बेई बिन १३ देशांमधल्या ६५ शहरांमधून धावला. यात अमेरिका, कॅनडा, चिली, मेक्सिको, ग्वाटेमाला, कोस्टरिका, अर्जेंटिना, पेरूसारख्या देशांचा समावेश आहे. या धावपटूने मार्च २०१८ मध्ये या प्रवासाला सुरूवात केली. या दरम्यान त्याला निसर्गाच्या आव्हानाला सामोरं जावं लागलं. काही ठिकाणी तापमान उणे दहा अंशांपर्यंत तर काही ठिकाणी ४० ते ४५ अंश सेल्सियस होतं. मात्र प्रतिकूल परिस्थितीतही त्याने हार मानली नाही. एवढा लांबचा पल्ला गाठण्याची तयारी त्याने तीन वर्षांपूर्वीपासूनच सुरू केली. २०११ मध्ये त्याने दहा हजार किलोमीटरचं अंतर पार केलं होतं. त्यामुळे दोन ध्रुवांमधलं अंतरही यशस्वीपणे पार करण्याचा विश्वास त्याला होता. या धावेच्या तयारीसाठी बिनने दररोज ६० ते ७० किलोमीटर धावायचं ठरवलं. दोन ध्रुवांमधलं हे अंतर पार करण्यासाठी बिन पहाटे पाच वाजता धावायला सुरूवात करायचा. थोडी फार विश्रांती घेत तो रात्री ९ वाजेपर्यंत धावायचा. बिनने याआधीही धावण्याचा विक्रम केला आहे. २०११ मध्ये त्याने १५० दिवसांमध्ये दहा हजार किलोमीटरचं अंतर पार केलं होतं. अशा या विक्रमवीर बिनचं कौतुक करावं तेवढं कमी आहे.



## चुकीची पोस्ट केली तर...

सोशल मीडियावर बरीच आक्षेपार्ह विधानं केली जातात. समाजात फूट पाडणाऱ्या पोस्ट्स केल्या जातात. त्यावर अंकुश लावण्यासाठी बरेच प्रयत्न होतात. मात्र ऑस्ट्रिया सरकारने या प्रकरणी दोषी आढळणाऱ्यांना वेगळीच शिक्षा देण्याचं ठरवलं आहे. दोषी लोकांना न्यू आर्ट या एनजीओतर्फे सुरू करण्यात आलेला सहा महिन्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणार आहे. २०१८ मध्ये ७३ लोकांनी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. 'डायलॉग इन्स्टेड ऑफ हेट' या नावाचा हा अभ्यासक्रम आहे. पुढच्या दोन महिन्यांमध्ये हा अभ्यासक्रम संपूर्ण देशभरात सक्तीचा करण्यात येणार आहे. चुकीच्या पोस्ट्स प्रकरणात दोषी आढळणाऱ्यांविरोधात कोर्टात खटले चालवण्याऐवजी हा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा मार्ग अवलंबण्यात आला आहे. ऑस्ट्रियातल्या राजकीय पक्षाच्या एका नेत्यालाही या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यावा लागला. या नेत्याने देशातल्या शरणार्थींविरोधात चुकीचं विधान केलं होतं. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर लोकांचे विचार बदलतील आणि ते विवेकी मार्गाने वाटचाल करतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.





## हे आहेत नवे विद्यार्थी

महाराष्ट्रात मराठी शाळा बंद पडत आहेत. प्रादेशिक भाषेतल्या शाळांचीही हीच अवस्था आहे. शाळा वाचवण्यासाठी, विद्यार्थीसंख्या वाढवण्यासाठी बरेच प्रयत्न केले जातात. फ्रान्समध्येही एक शाळा वाचवण्यासाठी भन्नाट उपाय करण्यात आला. या देशातल्या क्रेत्स ऑन बेलडॉन नावाच्या शहरातली ही एक प्राथमिक शाळा आहे. शाळेत फक्त २६१ विद्यार्थी शिक्षण घेत असून इथले काही कक्ष बंद होण्याच्या मार्गावर आहेत. काही पालकांनी शाळेतल्या मुलांच्या घटत्या संख्येबद्दल तक्रारही केली होती. त्यानंतर विद्यार्थीभरतीची मोहीम हाती घेण्यात आली. आता हे नवे विद्यार्थी कोण आहेत, हे जाणून घेतल्यावर तुम्हाला आश्चर्याचा धक्का बसेल. या शाळेत मेंढ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. १५ मेंढ्या या शाळेतल्या वर्गांमध्ये बसणार आहेत. या शहराची लोकसंख्या फक्त चार हजार असल्यामुळे शाळेतल्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस घटत आहे. शाळेतल्या प्रवेशासाठी स्थानिक मेंढपाळाने मेंढ्या पुरवल्या आहेत. या मेंढ्यांचा जन्मदाखलाही शाळेत सादर करण्यात आला. या मेंढ्यांच्या शाळेतल्या प्रवेशासाठी एक पालक गेल लावेल यांनी पुढाकार घेतला होता. या शाळेत ११ इयत्ता आहेत. इयत्तांची संख्या १० करण्याला त्यांचा विरोध होता. यामुळे प्रत्येक वर्गात २४ ते २६ मुलं बसतील. मुलांची संख्या वाढली की त्यांच्याकडे लक्ष देता येणार नाही, असा आक्षेप गेल यांनी घेतला होता.

## सबकुछ महिला!

महिलांनी सर्वच क्षेत्रात बाजी मारली असली तरी ठराविक कामांमध्ये पुरुषांची मक्तेदारी पहायला मिळते. बांधकाम व्यवसायात आजही महिलांचं प्रमाण खूप कमी आहे. त्यातही महिला रंगकाम, सुतारकाम, गवंडीकाम करत नाहीत. मात्र केरळमधल्या महिलांनी या क्षेत्रातही मुसंडी मारली आहे. काही महिलांनी एकत्र येऊन ऑल वूमन कंस्ट्रक्शन कंपनी स्थापन केली असून या कंपनीतली प्रत्येक जबाबदारी महिलांच्या खांद्यांवर आहे. ३० महिलांनी एकत्र येऊन पिंक लॅडर नावाची कंपनी सुरू केली. पिंक लॅडरला कॉन्ट्रॅक्ट दिलं की सर्व महिला कामाला लागतात. बांधकामाच्या साईटवर सर्व महिला काम करताना दिसतात. १ नोव्हेंबर २०१८ या



दिवशी पिंक लॅडरची सुरूवात झाली. आत्तापर्यंत त्यांनी दोन घरांचं बांधकाम केलं आहे. इतर तीन घरांचं कामही पिंक लॅडरला मिळालं असून त्यांचं काम सुरू आहे. पिंक लॅडर ही कंपनी सरकारी योजनेतून सुरू झाली आहे. महिलांना मिळणाऱ्या मानधनाबाबत बराच भेदभाव केला जातो. कामाच्या ठिकाणी महिलांबाबत होणार भेदभाव बघून या महिलांनी कंबर कसली आणि ही बांधकामक्षेत्रातली कंपनी सुरू केली. १०० टक्के साक्षरता असणाऱ्या केरळमधल्या एका मॉलमध्येही सर्व महिला कर्मचारी आहेत. या मॉलमध्ये १०० दुकानं आहेत. या सर्व दुकानांची मालकी महिलांकडे आहे. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने केरळने टाकलेलं हे एक पाऊलच म्हणावं लागेल.

# एसटीच्या तीनही बसस्थानकातील ‘चौकशी कक्ष’ ठरताहेत निरुपयोगी

## सर्व ठिकाणचे दूरध्वनी बंद, अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून चौकशीबाबत टोलवाटोलवी, प्रवाशांची होतेयं मोठी गैरसोय

नगर – शहरात एसटी महामंडळाची तीन स्थानके आहेत. या तिन्ही बसस्थानकात प्रवाशांच्या आणि नागरिकांच्या सोयीसाठी ‘नियंत्रण कक्ष’ (चौकशी कक्ष) पूर्वीपासून अस्तित्वात आहे. परंतु या नियंत्रण कक्षातील दूरध्वनी मागील काही महिन्यांपासून बंद असल्याने नागरिकांना थेट बसस्थानकात येऊन गाड्यांच्या वेळापत्रकाची चौकशी करावी लागत आहे. माळीवाडा बसस्थानकात चौकशी केल्यास तारकपूर बसस्थानकात जाण्याचा सल्ला दिला जातो. तारकपूर बसस्थानकात चौकशीसाठी गेल्यास स्टेशन रोडवरील पुणे बसस्थानकात चौकशीसाठी पाठविले जात असल्याने नागरिकांसह प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. गाड्यांच्या वेळापत्रकाची एसटीच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून व्यवस्थित आणि खात्रीशीर माहिती मिळत नसल्याने एसटीच्या कामकाजाबाबत नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शहरातील तीन बसस्थानकांपैकी मध्यवर्ती असलेल्या माळीवाडा बसस्थानकाच्या नूतनीकरणाचे काम सध्या सुरू आहे. त्यामुळे गाड्या सुटण्याच्या ठिकाणांमध्ये काहीसा बदल करण्यात आलेला आहे. या तिन्ही बसस्थानकात प्रवाशांच्या सोयीसाठी नियंत्रण कक्षात (चौकशी कक्ष) दूरध्वनी पूर्वीपासून अस्तित्वात आहेत. या दूरध्वनीवर नागरिक, प्रवाशी गाड्यांची चौकशी करतात आणि गाडी सुटण्याच्या वेळी बसस्थानकात येतात. त्यामुळे त्यांचा वेळही वाचतो आणि गैरसोयही टळली जाते. परंतु महामंडळाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे ही सेवा पूर्णतः विस्कळीत झालेली आहे. एखाद्या प्रवाशाने गाडीच्या वेळापत्रकाबाबत चौकशी करण्यासाठी सदरचे दूरध्वनी केल्यास एकतर ते उचललेच जात नाहीत आणि उचलले तरी समोरच्या व्यक्तीला माहिती देण्याऐवजी दूरध्वनीचा ‘रिसिव्हर’ बाजूला ठेवून दिला जातो. त्यामुळे वारंवार दूरध्वनी करूनही नागरिक, प्रवाशाचा संपर्क होत नाही. मागील काही महिन्यापासून तर तिन्ही बसस्थानकातील दूरध्वनी बंद अवस्थेत असल्याचे प्रवाशांच्या निदर्शनास येत आहे. बाहेरगावी, बाहेरील जिल्ह्यात प्रवास करणारे अनेक प्रवाशी दूरध्वनीवरून गाड्यांची चौकशी करतात मात्र दूरध्वनी बंद असल्याने त्यांना थेट बसस्थानकात येऊन चौकशी करावी लागत आहे. तेथेही त्यांना योग्य माहिती दिली जात नसून, एका बसस्थानकातून दुसऱ्या बसस्थानकात पाठविले जाते. त्यामुळे त्यांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीची दखल घेऊन तात्काळ दूरध्वनी चालू ठेवण्याचे आदेश द्यावेत. तसेच कनिष्ठ कर्मचाऱ्यांच्या मनमानीला लगाम घालावा, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# जिल्ह्यात २८ फेब्रुवारीपर्यंत पशुगणना मोहीमेचे आयोजन

## जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांची माहिती

नगर – जिल्ह्यातील पशूंची गणना करण्याची मोहीम २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत करण्यात येणार असून या मोहिमेत जनावरांची खरी माहिती पशुपालकांनी द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले आहे.

जिल्ह्यात करण्यात या गणनेत गायवर्ग, म्हसवर्ग, शेळी–मेंढी, अश्व, वराह यांच्यासह बिल्ला मारलेल्या (टॅगींग केलेल्या) जनावरांची व भटक्या समुदायातील पशुधनाची गणनाही करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण भागात २९५ प्रगणक व ७६ पर्यवेक्षक तर शहरी भागात ५६ प्रगणक व १८ पर्यवेक्षकांची या कामासाठी नियुक्ती केली जाणार आहे.

पशुगणनेमुळे जनावरांची नेमकी संख्या स्पष्ट होते. त्यानुसार शासनाकडून धोरण, योजना आखल्या जातात. निधीची उपलब्धता केली जाते, शिवाय पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात असलेल्या पशुधनानुसार लसीकरणासाठी औषधांचा पुरवठा केला जातो. तसेच याचा फायदा त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाय योजना राबवितांना होणार असल्याने आपल्याकडील जनावरांची माहिती द्यावी, असे पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. सुनिल तुंबारे यांनी कळविले आहे.

# ‘लाडकी बहिण’ च्या माध्यमातून सत्तापेंढाऱ्यांनी महाराष्ट्रात वेड्या बाभळीची शेती व्यापक केली

## ‘लाडकी माई भूमीगुंठा योजने’कडे महाविकास आघाडीने दुर्लक्ष केल्याने विधानसभेत फटका बसला



नगर – लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून कायदेशीर रीतीने घाऊक मतदार अक्कलमारी करणाऱ्यांविरुद्ध महाविकास आघाडीच्या नेत्यांना पीपल्स हेल्पलाइनने लाडकी माई भूमीगुंठा योजना सुचवली होती, मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने महाविकास आघाडीला फटका बसल्याचा दावा संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. या योजनेकडे शरद पवार व बाळासाहेब थोरात यांनी दुर्लक्ष केले त्यातून लाडक्या बहिण योजनेच्या माध्यमातून सत्तापेंढारी यांनी पूर्णपणे महाराष्ट्रात वेड्या बाभळीची शेती व्यापक केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

लाडकी बहिण या कायदेशीर मतदार अक्कलमारीचा प्रयोग मध्यप्रदेश, हरियाणा, महाराष्ट्रात यशस्वी झाल्याने थोड्याच दिवसात संपूर्ण भारतात आणि शेजारच्या राष्ट्रांमध्ये पोहोचल्या शिवाय राहणार नाही. यातून इंग्रजांनी राबवलेल्या शोषण पद्धतीचा वापर स्वतंत्र्योत्तर ७७ वर्षात देखील चालू राहणार आहे. भारतात लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती या तत्वज्ञानावर आधारित शासन शिवाजी महाराजांनी यशस्वी केले. कारण उन्नत चेतनेवर आधारित कायद्याचे राज्य त्यांनी राबविले. त्यामध्ये आपण सर्व, आपणा सर्वांचे व आपणा सर्वांसाठी हे तत्व होते. यापूर्वी शोषक राजांनी मी, माझे व मलाच या तंत्राचा वापर केला. त्याचप्रमाणे सध्याच्या राज्यकर्त्यांनी आंम्ही, आंम्हाला आणि आमच्यासाठी हे तंत्र सुरू ठेवले आहे. त्यातून राजकारण आणि धर्म यांच्या सीमारेषा पुसून टाकून मतदान अक्कलवारी टोकाला पोहोचली असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

मनूने कायद्याच्या माध्यमातून भारतातील स्त्रीया आणि दलितांवर सामाजिक आणि आर्थिक दास्य लादले. त्यातून आर्थिक दुबळे झालेल्या मतदारांचा मध्य प्रदेशांमध्ये निर्माण झालेल्या शकुनी काव्याने मतदार अक्कलमारी व्यापक झाली आहे आणि त्यातूनच वेड्या बाभळीची शेती राजकारण आणि धर्म प्रांतांमध्ये राबवली जात आहे. एकंदरीत उन्नत चेतना पायदळी तुडवून राज्यकर्ते आणि धर्मप्रमुख हे सत्तापेंढारी कुबेरशाही निर्माण करुन देशात राबवीत आहे. कोट्यावधी लोकांना राहण्यासाठी घरे नाही, ७० टक्के लोक आर्थिक विवंचनेत आहेत याचा गैरफायदा सध्याच्या राज्यकर्त्यांनी घेतला असल्याचे ॲड. कारभारी गवळी यांनी म्हंटले आहे.

राजकीय पक्षाच्या नेत्याकडे उन्नत चेतना आणि मुत्सद्देगिरी नसल्यामुळे आणि लबाडीने सत्ता मिळवणे, खोटी प्रतिष्ठा मिळवून आणि जनतेची संपत्ती घरी घेऊन जाणे यावर सगळ्यांचे लक्ष असल्यामुळे २१ व्या शतकातील आणि स्वतंत्र्याच्या ७५ वर्षात नंतर देखील भारतात लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती सार्वजनिक जीवनात राबविता आलेली नाही. या देशात कायद्याने प्रतिखासदार आणि प्रति आमदार निर्माण करुन आमदार व खासदारांवर लक्ष ठेवण्यासाठी अधिकार देणाऱ्या तंत्राचा वापर लोकशाही संरक्षण कायद्यामध्ये सादर केला जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# अर्धवट रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे अन्यथा कार्यालयात धूळफेक आंदोलन करू



भातोडी पारगाव ते टाकळी काझी दरम्यान रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्यात यावे अन्यथा ८ दिवसानंतर बांधकाम विभागाच्या कार्यालयात याच रस्त्याची धूळ आणून धूळफेक आंदोलन करण्याचा इशारा अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे देताना जनआधार सामाजिक संघटनेचे पदाधिकारी.

नगर – भातोडी पारगाव ते टाकळी काझी दरम्यान रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्यात यावे अन्यथा ८ दिवसानंतर संघटनेच्या वतीने बांधकाम विभागाच्या कार्यालयात याच रस्त्याची धूळ आणून धूळफेक आंदोलन करण्याचा इशारा जनआधार सामाजिक संघटनेने दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, मागील ४ महिन्यापूर्वी ८ कोटी रुपये निधीच्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरू करण्यात आले होते परंतु मध्यंतरी पावसामध्ये काम थांबल्यानंतर अद्यापपर्यंत काम सुरू होणे अपेक्षित होते यात महत्त्वाचे कारण म्हणजे रस्त्यावर यापूर्वी पाणी साचत असल्याने आपल्या विभागाच्या वतीने तातडीने रस्त्याची उंची वाढवण्यासाठी जी खडीकरण मुरुमीकरण केले आहे मात्र त्या मुरुमीकरणावरून अवजड वाहनांची ये जा होऊन सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले आहे तसेच रस्त्याच्या दुतर्फा असणारी सर्व शेतीची पिके हे धुळीमुळे नुकसानग्रस्त झालेले आहे. खडीकरण उघडे पडल्याने रस्त्यावर धावणाऱ्या गाड्यांच्या टायरने खडे उडून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना लागत असून छोटे–मोठे अपघात देखील होत आहे तसेच या खडीमुळे एखादा गंभीर स्वरूपाचा अपघात देखील होऊ शकतो त्यामुळे तातडीने या सर्व बाबीची चौकशी करून या रस्त्यावर तातडीने पाणी मारण्याची व्यवस्था करावी तसेच संबंधित ठेकेदाराला तात्काळ काम सुरू करण्याचे आदेश देण्यात यावे या मागणीसाठी बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी के.बी.शेळके यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी जनआधार सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश पोटे, शहबाज शेख, रवी पवार, अशोक बनसोडे, दीपक गुगळे, अमित गांधी आदी उपस्थित होते.



## त्रिशरण पंचशील, भीम स्मरण भीम स्तुती करुन अभिवादन...

संविधान दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार आपण करुन त्रिशरण पंचशील, भीम स्मरण भीम स्तुती करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे, शहराध्यक्ष हनीफ शेख, अमर निरभवणे, ओरे प्रवीण, सुरेश पानपाटील, भारतीय बौद्ध महासभेचे महिला जिल्हाध्यक्ष सुनीता गायकवाड, संगीता खंडागळे, प्रथम शहराध्यक्ष बौद्धाचार्य दिपक पाटोळे, राहुल कांबळे, गोरख केदारे, लक्ष्मण माघाडे, दिपक गायकवाड, राहुल पंडागळे, संतोष जाधव, संदीप वाघमारे, अरुण गायकवाड, सुमित माळवे, प्रेम कांबळे, बंटी आंग्रे, समर्थ कांबळे, सतीश कांबळे, स्मित कांबळे, आर्यन कांबळे, आदी देठे, आर्यन कांबळे आदी.

# श्री रामकृष्ण शाळेच्या स्नेहसंमेलनामध्ये ३० नोव्हेंबरला ‘कृष्णलीला’चे सादरीकरण

नगर – २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत श्रीरामांच्या जन्मभूमीवर प्रभू श्री रामचंद्रांची प्राणप्रतिष्ठा झाली. त्याचे औचित्य साधून श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना ज्यु कॉलेजच्या मॅनेजमेंट शिक्षक व साडेचारशे विद्यार्थी यांनी संमेलनाच्या माध्यमातून उत्कृष्ट रामकथा सादर केली होती. समस्त पालक व नगरकरांना त्यांनी सादर केलेली रामकथा खूप आवडली व त्यांच्या आग्रहास्तव माऊली संकुल मध्ये त्याचे परत एकदा सादरीकरण करण्यात आले.

त्याच धर्तीवर श्री रामकृष्ण शाळेचे ४०० विद्यार्थी ३० नोव्हेंबर रोजी नंदनवन लॉन्स येथे यावर्षीच्या स्नेहसंमेलनामध्ये कृष्णलीला सादर करत आहेत. बालकृष्णाच्या कृष्णलीला–रासलीला–कंसवध–सुदामा भेट–अर्जुनला उपदेश अशा रंगतदार प्रसंगांमधून नृत्य व नाट्याचा उत्कृष्ट मिलाप करून सुंदर अशी कृष्णलीला सादर होत आहे.

हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून येऊन नगरकरांनी त्याचा आनंद घ्यावा असे आवाहन संस्थेच्या कमिटीने केले आहे.

# प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे शाळांना परवडणारे नाही

## शंभर टक्के अपार आयडीच्या नोंदणीसाठी सक्ती करू नये अन्यथा आंदोलन



शंभर टक्के अपार आयडीच्या नोंदणीसाठी सक्ती करू नये अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा माध्यमिक शिक्षक संघटनेच्या वतीने शिक्षणाधिकारी यांना निवेदनाद्वारे देण्यात आला.

नगर – प्रत्येक वर्ग खोल्यात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे शाळांना परवडणारे नसल्याने, प्रत्येक वर्ग खोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे सक्तीचे करू नये व अपार आयडीसाठी मुदत वाढ देण्याची मागणी माध्यमिक शिक्षक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

संघटनेच्या शिष्टमंडळाने जि.प. माध्यमिकचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस, वेतनपथक अधीक्षक रामदास म्हस्के व उपशिक्षणाधिकारी संध्या भोर यांची भेट घेऊन सदर प्रश्नी चर्चा केली व सदर मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी माध्यमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे, जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, जुनी पेन्शन संघटनेचे समन्वयक वैभव सांगळे, सचिन वाकचौरे, भीमाशंकर तोडमल, तौसिफ शेख, डी. डी. कपाळे, एल.एम. गावडे, ए. डी. देंडगे, एस. बी. गायकवाड, भानुदास बेरड, ए. वाय. साबळे, डी. आरोटे, एन. जी. गीते, एस. जे. शर्मा आदींसह शिक्षक वर्ग उपस्थित होते.

शिक्षण विभागाकडून १४ नोव्हेंबर रोजी पत्र काढले असून, वर्ग खोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत सक्ती केलेली आहे. तथापि शासन आदेशानुसार शालेय परिसरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. त्याचा खर्च शाळेनी केलेला आहे. परंतु प्रत्येक वर्ग खोल्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचा खर्च शाळांना परवडणारा नाही. तसेच अपार आयडी मध्ये कामकाज करताना अनेक तांत्रिक अडचणी येत आहेत. पालकांकडून सहकार्य मिळत नाही, म्हणून शंभर टक्के अपार आयडीच्या नोंदणीसाठी सक्ती करू नये. अन्यथा शिक्षकांनी या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# ‘डायल ११२’ वर कॉल करून खून झाल्याची पोलिसांना दिली खोटी माहिती; गुन्हा दाखल

नगर पोलिस दलाने नागरिकांना तातडीने मदत मिळण्यासाठी सुरु केलेल्या डायल ११२ वर एकाने कॉल करून खुन झाल्याची माहिती दिली. त्यामुळे पोलिसांची एकच धावपळ उडाली, पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी भेट देत चौकशी केली असता खुन झाल्याबाबत डायल ११२ वर देण्यात आलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी कॉल करणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. परशराम रावसाहेब दिवे (वय ३१,रा. हनुमाननगर, कोपरगाव) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे.

कोपरगांव शहर पोलीस स्टेशनचे डायल ११२ चे एमडीटी मशिनवर मंगळवारी (दि.२६) सायंकाळी ६.२८ वाजता कॉल आला की, हनुमाननगर गेट कोपरगांव या ठिकाणी माझ्या भावाचा काल खुन झाला असुन, त्याचा मृतदेह सापडत नाही तरी तात्काळ पोलीस मदत पाठवा असा कॉल आल्याने सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन पोलीस निरीक्षक भगवान मथुरे यांनी तात्काळ स.पो.नि.आशिष शेळके, पो.कॉ. धोंगडे, पो.कॉ साळुंखे यांना सदर ठिकाणी खात्री करण्यासाठी रवाना केले. त्यांनी सदर ठिकाणी जावुन कॉलकरणाऱ्याला संपर्क केला असता त्याने पोलीसांना काही एक प्रतिसाद दिला नाही.

तेव्हा पोलीसांनी तेथील स्थानिक नागरीकांकडे विचारपुस केली असता सदर ठिकाणी कोणताही खुन झालेला नसल्याचे सांगितले. त्यानंतर कॉल करणाऱ्याला वारंवार संपर्क करून त्याची भेट घेवुन त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने परशराम दिवे असल्याचे सांगितले. त्यावेळी त्याचेकडे घटनेबाबत सविस्तर विचारपुस केली असता त्याने सांगितले की, त्याचा मोठा सावत्र भाऊ संतोष आडांगळे याचा पहाटे ३ वाजता खुन झालेला आहे आणि त्याचा मृतदेह हा तेथेच राहणारा माउ पवार याने गोणीत घालुन घेवुन जातांना मी पाहिले आहे असे सांगितले.

त्यानंतर पोलीसांनी त्याच्या पत्नी कडे विचारपुस केली असता त्यांनी संतोष आडांगळे याचा मोबाईल नंबर दिल्याने पोलीसांनी त्या नंबरवर संपर्क केला असता त्याने सांगितले की, मी जिवंत असुन सुस्थितीत आहे. त्यामुळे पोलीसांची खात्री झाली की, परशराम दिवे याने कोणतीही खुनासारखी घटना घडलेली नसतांना पोलीसांना त्रास व्हावा या खोडसाळ वृत्तीने डायल ११२ यावर कॉल करुन खोटी माहिती दिली. म्हणुन आरोपी परशराम दिवे याचे विरुध्द कोपरगांव शहर पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २१२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सर्व नागरीकांना पोलिसांचे आवाहन

महाराष्ट्र पोलीस दलातर्फे डायल ११२ ही सुविधा अत्यावश्यक सेवा म्हणून नागरीकांना वेळे प्रसंगी तात्काळ मदत उपलब्ध होण्याकरीता सुरु करण्यात आलेली आहे. तरी नागरीकांनी डायल ११२ वर खरोखरच मदतीची आवश्यकता असल्यास पोलीस मदतीकरीता कॉल करावा. उगीचच खोटे कॉल करुन प्रशासनाची दिशाभूल व फसवणूक करु नये. डायल ११२ ला कॉल करुन खोटी माहीती दिल्यास संबंधित इसमावर पोलीस स्टेशनला कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा नियंत्रण कक्ष येथील डायल ११२ युनिटचे पोलीस उपनिरीक्षक अंबादास हुलगे यांनी दिला आहे.

# अ.भा.सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी फेडरेशनची नगरमध्ये २८ नोव्हेंबर रोजी सर्वसाधारण सभा

AIRRF ESTD. 1961

नगर – देश पातळीवरील सेवानिवृत्त रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी काम करणाऱ्या रेल्वे पेन्शनर्स वेल्फेअर असोसिएशन सलग्न अखिल भारतीय सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी फेडरेशनची राष्ट्रीय स्तरावरील ५९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अहिल्यानगर मध्ये होत आहे. २८ नोव्हेंबर रोजी टिळकरोड वरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात एक दिवसीय सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १०:३० वाजता खासदार निलेश लंके यांच्या हस्ते सभेचे उद्घाटन होणार असून आ.संग्राम जगताप प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यावेळी अखिल भारतीय सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.सागर श्रीधर, जनरल सेक्रेटरी अतार सिंग यांच्यासह पूर्ण देशातून सुमारे ५०० प्रमुख सदस्य उपस्थित रहाणार आहेत, अशी माहिती रेल्वे पेन्शनर्स वेल्फेअर असोसिएशनचे अहिल्यानगर अध्यक्ष महेश सोनी यांनी दिली.

अखिल भारतीय सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी फेडरेशनच्या आजपर्यंत झालेल्या ५८ सर्वसाधारण सभा या हैद्राबाद येथेच झाल्या आहेत. नगरमध्ये होणारी ५९ वी सभा ही पहिलीच हैदाबाद बाहेर होणारी सभा असल्याने या सभेचे यजमानपद नगरला प्रथमच मिळाले आहे. नगरच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सभेच्या यशस्वीतेसाठी उत्कृष्ट नियोजन केले आहे, अशी माहिती असोसिएशनच्या अहिल्यानगरच्या सेक्रेटरी श्वेता मुळे यांनी दिली.

सभेसाठी पूर्ण देशातून अखिल भारतीय सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नगरमध्ये आगमन होण्यास सुरवात झाले असून नियोजन खजिनदार विनायक कुलकर्णी, ए. व्ही. पाटील, धनंजय तागडे, प्रकाश गाडेकर, चंद्रकांत ठाणगे आदींसह पदाधिकारी करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

